रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १३९ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १७ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹


## न्यायदेवतेच्या हाती तलवारीऐवजी संविधान

**नवी दिल्ली :** भारतातील न्यायव्यवस्थेसाठी प्रतिकात्मक असलेल्या न्यायदेवतेच्या पुतळ्याच्या स्वरूपात आता मोठा बदल करण्यात आला आहे. न्यायदेवतेच्या डोळ्यावरील असणारी काळी पट्टी आता हटवण्यात आली आहे. तसेच आधी ज्या हाती तलवार होती त्या हाती संविधान दिसत आहे. न्यायाधीशांच्या लायब्ररीमध्ये हा नवीन स्वरूपाचा पुतळा बसवण्यात आला आहे. प्रतिकात्मक दृष्टीने पाहिले तर काही महिन्यांपूर्वी बसवण्यात आलेला न्यायदेवतेचा नवीन पुतळा हा न्याय आंधळा नसतो असा स्पष्ट संदेश देत असल्याचं सांगितलं जातंय. तो संविधानाच्या आधारे काम करतो. सरन्यायाधीश डी.वाय चंद्रचूड यांच्या पुढाकाराने हा पुतळा बसवण्यात आल्याचं सांगण्यात येतंय. मात्र असे आणखी पुतळे बसवणार की नाही हे सध्या तरी स्पष्ट झालेले नाही.

## ‘लढायचं की पाडायचं?’

**। जालना । प्रतिनिधी ।** मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका करत राज्यातील मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारवर गंभीर आरोप केले. उपमुख्यमंत्री फडणवीस यांची राज्यातील विधानसभेची प्लॅनिंग पूर्ण अपयशी करणार, असा इशारा मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांनी दिला आहे. मला मोठ्या डाकूला खेटायचं आहे, असे जाहीर करत २० ऑक्टोबर रोजी मराठा समाजाची अंतिम निर्णय बैठक आयोजित केली असल्याची माहिती जरांगे यांनी दिली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर •› पान २ वर

**मनोज जरांगेंनी २० तारखेला बोलावली अंतिम बैठक**

# आ. गोगावले फेल, प्रवाशांच्या जीवाशी खेळ

### जुन्या गाड्यांना नवे इंजिन; महामंडळाच्या अध्यक्षपदावरुन हकालपट्टी करण्याची मागणी

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

**पालकमंत्री पदासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या गोगावलेंच्या झोळीत सरकारने शेवटच्या टप्प्यात एसटी महामंडळाची जबाबदारी दिली. दरम्यान, अथक तपश्चर्येनंतर पदरात पद पडल्यावर भारावून गेलेल्या आ. भरत गोगावलेंनी पद मिळाल्यानंतर कर्तव्य बजाविण्याकडे दूर्लक्ष केल्यामुळे आज हजारो प्रवाशांचा जीव धोक्यात आला आहे. जिल्ह्यातील एसटी बसेसच्या दुरवस्थेकडे बघण्यात त्यांना अजिबात रस नसल्याचा आरोप प्रवाशांनी केला आहे. दररोज लाखो प्रवासी एसटीतून प्रवास करतात. परंतु, या प्रवाशांच्या जीवाशी एसटी महामंडळ खेळ करीत असल्याचा प्रकार समोर आला आहे. आठ वर्षे जुन्या असलेल्या गाड्यांना रंगरंगोटी करून सीएनजीचे इंजिन (किट) बसविले जात आहेत. रायगड विभागात पेण, रामवाडी, रोहा, माणगाव, महाड आगारातील जुन्या गाड्यांना सीएनजीचे किट बसविण्यात आले आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी, आ. गोगावले यांची महामंडळाच्या अध्यक्षपदावरुन हकालपट्टी करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.**

एसटी महामंडळ रायगड विभागाच्या अखत्यारीत अलिबाग, पेण, रोहा, माणगाव, महाड, श्रीवर्धन, कर्जत व मुरूड अशी आठ आगार असून, १९ बसस्थानके आहेत. जिल्ह्यात ३८० बसेस असून, दिवसाला एक लाख प्रवासी एसटीतून प्रवास करतात. या माध्यमातून एसटीला सुमारे ३५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी एसटी महामंडळाने वेगवेगळ्या योजना सुरु केल्या आहेत. त्यामध्ये महिलांसाठी अर्धे तिकीटची सुविधा उपलब्ध केली आहे. एका बसमध्ये ५३ प्रवाशांची क्षमता असताना क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसमधून प्रवास करीत असल्याचे चित्र दिसून येते. प्रवासी संख्या वाढूनही महामंडळाकडून अद्याप नव्या गाड्या दाखल झाल्या नाहीत. जुन्याच गाड्यांना नवे रुप देऊन त्या प्रवाशांच्या सेवेसाठी रस्त्यावर पाठविल्या जात असल्याने प्रवाशांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. डिझेलचे वाढते दर, तसेच डिझेलच्या गाडीतून निघणारे धूर यामुळे प्रदूषण वाढत आहे. हे प्रदूषण रोखण्यासाठी, एसटीच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी गेल्या वर्षभरापासून सीएनजीवर धावणाऱ्या बसेस रायगड जिल्ह्यात दाखल झाल्या आहेत. रामवाडी, रोहा, माणगाव, महाड या ठिकाणी सीएनजी पंप सुरु केले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात दीडशेहून अधिक बसेस सीएनजीवर धावत आहेत. सीएनजीवर चालणाऱ्या बसेस नवीन आल्याचा भास प्रवाशांना झाला आहे. मात्र, बसेस नवीन नसून, जुन्याच असल्याचा प्रकार समोर आला आहे. आठ वर्षे जुन्या असलेल्या गाड्यांना रंगरंगोटी करून त्यातील डिझेलचे इंजिन काढून त्या जागी सीएनजीचे इंजिन लावण्याचे काम एका एजन्सीला देण्यात आले आहे. पेण आगारातील सीएनजी एसटी बसला आग लागली होती. चालकाच्या तत्परतेने ती आग आटोक्यात आणण्यास यश आले होते. तसेच काही सीएनजीच्या गाड्या घाटमाथ्यावर चढत नसल्याच्या तक्रारीदेखील दाखल झाल्या आहेत. एसटी महामंडळाच्या या कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



### प्रवाशांच्या सेवेत भंगार गाड्या

**रायगड जिल्ह्यातील पेण, रामवाडी, महाड, रोहा, माणगाव या आगारातून सीएनजीवरील बस धावत आहे. त्यामुळे डिझेलवर चालणाऱ्या जुन्या २५ गाड्या अलिबाग एसटी बस आगारात पाठविण्यात आल्या आहेत. सुमारे १२ लाख किलोमीटर प्रवास केलेल्या या गाड्या असून, गाड्यांची अवस्था बिकट आहे. गाडी सतत रस्त्यात बंद पडणे, चालकाच्या केबीनमधील वेल्डींग तुटलेली, गाडीतील सीट खराब झालेली, एसटीला गळती लागलेली अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. भंगारात काढण्यासाठी असलेल्या गाड्या रस्त्यावर धावत असल्याने त्याचा नाहक त्रास प्रवाशांना होत आहे. एसटी महामंडळाच्या या कारभाराचा तीव्र संताप प्रवाशांकडून केला जात आहे.**

> एसटी महामंडळ शासनाचा उपक्रम आहे. शासनाच्या निर्णयानुसार डिझेलवर चालणाऱ्या आठ वर्षे मुदतीच्या बसेसला सीएनजीचे किट लावल्यास त्यांना १५ वर्षांपर्यंत मुदत वाढविण्यात आली आहे. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जुने इंजिन बदलून नवीन इंजिन बसवून सीएनजी किट लावण्यात आले आहे.
> – महेश देवकाते, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण

> जुन्या बसेस रस्त्यावर चालवून प्रवाशांना त्रास दिला जात आहे. तांत्रिक बिघाड असलेल्या गाड्या रस्त्यावर धावत असल्याने प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. जुन्या नादुरुस्त बसेसबाबत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे.
> – योगेश पाटील, प्रवासी

# श्रीवर्धनमध्ये शिंदे गटाचे बंड

### अदिती तटकरेंविरोधात देणार उमेदवार; प्रमोद घोसाळकर यांची माहिती

**। पाली/बेणसे। धम्मशिल सावंत ।**




विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात महायुतीत संघर्ष होण्याची चिन्ह निर्माण झाली आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून आदिती तटकरे यांच्या विरोधात उमेदवार रिंगणात उतरण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघात सुनिल तटकरे सातत्याने सुधाकर घारेंना ताकद देण्याचे काम करत आहेत. आमदार नसलेल्या माणसाला कोट्यवधींचा निधी दिला जातो. तटकरे यांनी महायुतीचा धर्म पाळावा. महायुतीतील आ. महेंद्र थोरवे यांच्याविरोधात घारे निवडणूक लढविण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे आम्ही श्रीवर्धन मतदारसंघातही आमचा उमेदवार उभा करू. जनतेने उमेदवाराची मागणी केली आहे. खासदारकीच्या वेळेला तटकरे यांना आम्ही मदत केली, मात्र ते आता युतीचा धर्म पाळत नाहीत. असा घणाघाती आरोप शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी केला.

श्रीवर्धन दिवेआगर येथे पत्रकार परिषद घेऊन जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांच्यासह श्रीवर्धन तालुका प्रमुख सुरेश मिरगल, रोहा तालुका प्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे व अन्य प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद पार पडली. यावेळी ते बोलत होते.

राष्ट्रवादी अजित पवार गट विरुद्ध शिंदेंची शिवसेना एकमेकांविरोधात भिडणार असल्याने रायगडच्यामहायुतीतसंघर्षाचीठिणगी पडली असल्याचे त्यांनी सांगितले. घोसाळकर म्हणाले की, श्रीवर्धन मतदारसंघहाशिवसेनेचाबालेकिल्ला होता. या मतदार संघातून तीनवेळा शाम सावंत निवडून आले होते. नारायण राणे यांनी राजीनामा दिल्यानंतर •› पान २ वर

## आचारसंहितेनंतरही शासनाकडून निर्णयांचा पाऊस

**मुंबई :** राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता मंगळवारी जाहीर करण्यात आली. त्यानंतर राज्य सरकारकडून बुधवारीदेखील अनेक शासन निर्णय जारी करण्यात आले. त्यानंतर निवडणूक आयोगाने कारवाईचा बडगा उचलते राज्य सरकारला यासंदर्भात विचारणा करताच सर्व शासन निर्णय वेबसाईटवरून हटवण्यात आले आहेत.

केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी पत्रकार परिषद घेऊन आचारसंहिता जाहीर केली. त्यानंतर मुख्य निवडणूक अधिकारी यांनी राज्य सरकारला पत्र लिहून शासन निर्णय किंवा कुठल्याही टेंडर काढू नये असे आदेश दिले होते. मात्र या आदेशाला केराची टोपली दाखवत राज्य सरकारच्या अनेक विभागाने बुधवारीही शासन निर्णय जारी केले होते. •› पान २ वर

## महादेव जानकर सोडणार महायुतीची साथ

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्राच्या राजकारणात आता ट्विस्ट येण्याची शक्यता आहे. कारण महादेव जानकर यांनी थेट महायुतीमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. महादेव जानकर हे राज्यातील विधानसभेच्या सर्व २८८ जागा लढवण्यावर ठाम आहेत. ते प्रत्येक मतदारसंघात उमेदवार उभे करणार आहेत. त्यामुळे महायुतीची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. महादेव जानकर गेल्या काही दिवसांपासून महायुतीत नाराज असल्याची चर्चा सुरु होती. महायुतीच्या जागावाटपात आपल्याला विचारलं जात नाही, अशी महादेव जानकर यांची खंत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.



महादेव जानकर यांना धनगर समाजाचा मोठा पाठिंबा आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये महादेव जानकर यांच्या पक्षाची ताकद आहे. महादेव जानकर यांची सोलापूर, बारामती, मराठवाड्यातील काही भाग, परभणी, बीड, जालना आणि कर्नाटक लगतच्या प्रदेशात मोठी ताकद आहे. जिथे धनगर समाजाची संख्या जास्त आहे तिथे महादेव जानकर यांच्या पक्षाला चांगला पाठिंबा आहे. त्यामुळे जानकर यांनी महायुतीला सोडचिठ्ठी देणं हे महायुतीला डोकेदुखी ठरु शकतं. त्यामुळे जातीय समीकरणांचा विचार करता भाजपला महादेव जानकर यांची मनधरणी करण्यात यश येतं का? ते पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे.

मी कुणावर नाराज नाही. राष्ट्रीय समाज •› पान २ वर

## वेध्क

## ‘मविआ’चा जागा वाटपाचा तिढा सुटला

**नवी मुंबई :** निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर केली आहे. राज्यातील २८८ जागांसाठी २० नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. या घोषणेने राज्यातील राजकीय तापमान चांगलेच तापले आहे. राजकीय पक्षांनी तयारीला सुरुवात केली आहे. महाविकास आघाडीत २२२ जागांवर एकमत झाले आहे. तिन्ही पक्ष सध्या या जागांवर उमेदवार निवडीची प्रक्रिया पुढे नेणार आहे. २० ऑक्टोबरला काँग्रेसच्या बैठकीत ८४ जागांवर शिक्कामोर्तब होणार आहे. महाविकासला पाठिंब्याची लाट असल्याचा काँग्रेसचा दावा आहे.

## बॉम्बच्या धमकीनंतर विमानांचे लँडिंग

**नवी दिल्ली :** इंडियन एअरलाइन्सच्या आणखी सात विमानांना बुधवारी बॉम्बच्या धमक्या मिळाल्या. यामध्ये इंडिगोच्या चार, स्पाइसजेटच्या २ आणि अकासाच्या एका फ्लाइटचा समावेश आहे. गेल्या ३ दिवसांत १९ विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. १५ ऑक्टोबर रोजी ७ फ्लाइट्सवर बॉम्बच्या धमक्या आल्या होत्या. दिल्ली ते शिकागो या एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानाचाही या उड्डाणांमध्ये समावेश होता. त्याला कॅनडाला वळवण्यात आले आणि इक्लुइट विमानतळावर उतरवण्यात आले. तपासादरम्यान या विमानांमध्ये बॉम्ब असल्याच्या बातम्या खोट्या असल्याचे निष्पन्न झाले.

## आंबिवली ग्रामपंचायतीची मनमानी सुरुच

### पाचव्या दिवशी ही ग्रामस्थांना पाणी नाही

**। पेण । मुस्कान खान ।**

आंबिवली ग्रामपंचायतीमध्ये सरपंच या आदिवासी समाजाच्या असल्याने या आदिवासी महिलांना कमी लेखून उपसरपंच मनमानी कारभार करीत आहे. पाच दिवस झाले तरी आंबिवली ग्रामस्थांना पाण्याची सोय करुन देत नाही. अखेर पाणी का मिळत नाही म्हणून पुन्हा एकदा महिला ग्रामपंचायतीमध्ये विचारायला गेल्या असता पहिल्यांदा पाणीपट्टी भरा नंतरच पाणी पुरवठा केला जाईल, असे उद्धट उत्तर ग्रामसेवकांकडून देण्यात आले. महत्वाची बाब म्हणजे गावातील नगरिकांनी आपली घरपट्टी, पाणीपट्टी ही ३१ मार्चपर्यंत भरणे बंधनकारक असते. ३१ मार्चनंतर पाणीपट्टी न भरल्यास दंडात्मक कारवाई होते. जर ३१ मार्चपर्यंत नागरिकांजवळ शासन नियमानुसार घरपट्टी व पाणीपट्टी भरण्याची मुभा असेल तर, ग्रामसेविका पाण्याविना कोणत्या अधिकाराने गावातील नागरिकांना वेठीस धरीत आहे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



सत्तेच्या जीवावर मनमानी करुन आणि सत्ताधाऱ्यांच्या सांगण्यावरून ग्रामसेविका देखील ग्रामस्थांना पाणी देण्यास टाळाटाळ करीत आहे. भाजप उपसरपंच जगदीश पाटील हेदेखील •› पान २ वर

> ग्रामपंचायतीचे सत्ताधारी जाणीवपूर्वक नियमबाह्य पाणीपट्टीची मागणी करीत आहेत. फक्त गावातील ग्रामस्थांना त्रास देण्याच्या उद्देशाने सरपंच, उपसरपंच नियमबाह्य पाणीपट्टीचा भरणा करण्यास सांगत आहेत. उपसरपंच जगदीश पाटील हा गावात राहत नसल्याने त्याला गावातील नागरिकांच्या व्यथा समजतील तरी कशा? सुरु असणारी पाणी योजना बंद करुन मुद्दामहून नवीन पाणी योजना सुरु केली, ती ही निकृष्ठ दर्जाची. ग्रामस्थ ३१ मार्चच्या अगोदर पाणीपट्टी भरणार नाहीत. त्यानंतर न भरल्यास कायदेशीर कारवाईला सामोरे जायला तयार आहोत. मात्र आज पाणीपुरवठा बंद करुन फक्त आणि फक्त भाजपचा उपसरपंच स्वतःची मनमानी करीत आहे.
> –प्रशांत पाटील, माजी सदस्य, आंबिवली

## प्रशासनचे दुर्लक्ष;शासकीय जागेवर अतिक्रमण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आठवडा बाजारासाठी मागणी केलेल्या गट क्रमांक ३३२ मधील शासकिय जागेवर धनदांडग्यांनी अतिक्रमण केले आहे. प्रशासनाकडे वारंवार तक्रार अर्ज करूनही कारवाई केली जात नाही, असा आरोप कुर्डूस येथील ग्रामस्थ प्रभाकर पिंगळे यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे आठवडा बाजाराच्या जागेची प्रतिक्षा कायमच राहिली आहे.

### ■ कुर्डूस येथील ग्रामपंचायत समितीच्या पंचाचा आरोप

अलिबाग तालुक्यातील कुर्डूस येथील गट नंबर ३३२ मध्ये महसूल विभागाची जमीन आहे. ही जमीन कुर्डूस गावालगतच लागून आहे. आठवडा बाजारासाठी ही जमीन मिळावी, यासाठी ग्रामपंचायत पंच समिती व ग्रामस्थ •› पान २ वर



> ही जमीन गावकीची असल्याचे म्हणणे आहे. रायगड जिल्ह्यात गावकी व दळी जमीनीचे काय करावे, याबाबत कायद्यात काहीच प्रावधान नाही. या जमिनीबाबत काय करावे, याबाबत जिल्हा प्रशासनाने २०१८ ला शासनाकडे मार्गदर्शन मागितले आहे. गावाने जमीन खरेदी केली आहे. वैयक्तीक जमिनीवरील अतिक्रमण काढण्याचे काम शासनाचे नाही. आठवडा बाजारासाठी जागेची परवानगी लागत नाही. ग्रामपंचायत स्तरावरील हा विषय आहे. शासकीय जागेत अतिक्रमण केले असेल, तर संबंधित विभागामार्फत कारवाई केली जाईल.
> – संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड

> कुर्डूससह पंचक्रोशीतील अनेक गावे, वाड्यांमधील नागरिकांना जवळच बाजारपेठ निर्माण व्हावी, यासाठी शासकिय जागा आठवडा बाजारासाठी मिळावी, अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून केली जात आहे. सुरुवातीला प्रशासनाकडून चांगला प्रतिसादही मिळाला. परंतु त्याच जागेवर काही धनदांडग्यांनी अतिक्रमण करून बांधकाम सुरु केले आहे. त्या जागेची मोजणी करून बांधकाम हटवून आठवडा बाजारासाठी जागा देण्यात यावी. परंतु प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नाही. ही शोकांतिका आहे.
> –सुनील पिंगळे, ग्रामस्थ

### प्रतीक्षा संपली;पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण

## माथेरानची राणी नोव्हेंबरमध्ये येणार रुळावर

**। मुकुंद रांजणे।**
**। माथेरान।**

**सर्वानाच प्रतीक्षा असणारी नेरळ–माथेरान दरम्यान धावणारी माथेरानची महाराणी अर्थातच मिनिट्रेन १ नोव्हेंबरपासून रुळावर येणार असल्याचे रेल्वेच्या अधिकारी वर्गाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे पर्यटकांना प्रतीक्षा असणारी ही सेवा लवकरच उपलब्ध होणार असल्याने पर्यटकांसह स्थानिकांमध्ये आनंदाचे वातावरण दिसत आहे.**

दरवर्षी पावसाळ्यात घाटरस्त्यात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे दरडी कोसळण्याची भीती असते. याच कारणास्तव ही सेवा बंद करण्यात येते. त्यानंतर १५ ऑक्टोबर रोजी ही सेवा नेहमीच पूर्वपदावर येते; परंतु यावेळी काही तांत्रिक बाबी लक्षात घेऊन १ नोव्हेंबरपासून ही गाडी रुळावर येणार असल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. सद्यस्थितीत चार महिने घाटातील काही तांत्रिक बाबी तसेच रुळांची दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर करण्यात येत असून या महिन्यात अनेकदा मालवाहू ट्रेन नियमितपणे नेरळवरून माथेरान स्थानकापर्यंत ये-जा करत होती. पर्यटक हे खासकरून या गाडीची सफर करण्यासाठीच येतात. काही वर्षांपासून अमन लॉज ते माथेरान स्टेशन दरम्यान मिनिट्रेनची शटल सेवा उपलब्ध असल्याने पावसाळ्यातसुध्दा पर्यटक मोठ्या संख्येने हजेरी लावतात. नेरळ ते माथेरान मिनिट्रेनच्या मर्यादित आणि कमी फेऱ्या असल्यामुळे अनेकदा पर्यटकांना तिकिटाअभावी या गाडीचा आनंद घेता येत नाही. २१ किलोमीटरचा •› पान २ वर

**रेल्वे प्रशासनाने नव्या धाटणीची इंजिने उपलब्ध केल्यास गाडीच्या फेऱ्यात वाढ होऊन पर्यटन निश्चितपणे बहरेल. त्यासाठी स्थानिकांनी वरिष्ठ पातळीवर सातत्याने पाठपुरावा करणे आवश्यक आहे.**




# महामार्गावर भीषण अपघात

### एकाचा मृत्यू, एक गंभीर जखमी

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावर नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडणाऱ्या अपघातांची संख्या दिवसागणिक वाढतच चालली आहे. चार दिवसांपूर्वीच पाटणसई ग्रामपंचायत हद्दीत मोटार सायकलला अपघात होवून यात एक गंभीररित्या जखमी झाल्याची घटना ताजी असतानाच बुधवारी (दि.१६) याच हद्दीतील चिकणी गावाच्या प्रवेशद्वारासमोर दोन टेम्पोची समोरासमोर जोरदार धडक लागली. या भीषण अपघातात टाटाच्या छोट्या टेम्पोचे चालक प्रदीप नारायण कासुर्डे (रा.पिंपळगाव ता. मंडणगड) यांचा मृत्यू झाला; तर त्यांच्यासह प्रवास करणाऱ्या हसीना इस्माईल खलफे (मु.पो.पिंपळोली, ता. मंडणगड) यांना गंभीर दुखापती होऊन त्या गंभीर दुखापत झाली.



मिळालेल्या माहितीनूसार, मुंबईकडून कोलाड बाजूकडे जाणारा टाटा कंपनीचा टाटा ऐस (छोटा हाती) यातील चालक •› पान २ वर

# राजकीय पक्षांनी नियमांचे पालन करावे

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांची माहिती



**। रायगड । प्रतिनिधी ।**

**भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा केली असून जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांनी निवडणूक नियमांचे काटेकोरपणे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसमवेत आयोजित बैठकीत किशन जावळे बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले, निवडणुकीच्या कालावधीमध्ये विविध राजकीय पक्षांकडून सभा तसेच बैठकांचे आयोजन करण्यात येते. या सर्व सभा व बैठकांची माहिती प्रशासनास देऊन त्यासाठी आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करुन घ्याव्यात. मतदारांना कुठल्याही प्रकारचे प्रलोभन दाखविले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. विविध जाती, धर्म, भाषिक संप्रदायांमध्ये तेढ निर्माण होईल, असे कुठलेही वक्तव्य करू नये. कुठल्याही धार्मिक स्थळाचा प्रचारासाठी वापर करू नये. समाजमाध्यमांवर पोस्ट करतेवेळी आवश्यक ती काळजी घ्यावी असे किशन जावळे यांनी स्पष्ट केले.

निवडणूक प्रचार काळात सर्व राजकीय जाहिरातीचे प्रामाणिकरण करून घेणे आवश्यक आहे. जिल्हा माहिती कार्यालय येथे माध्यम कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. सर्वांनी विहित वेळेत परवानग्या घ्याव्यात असेही किशन जावळे यांनी सांगितले.निवडणुकीच्या काळात काय करावे व काय करु नये याबाबतची माहिती सर्व राजकीय पक्षांना उपलब्ध करुन देण्यात आली असून त्याचे कटाक्षाने पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे. यासाठी आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात येत आहे. त्या संदर्भात अधिसूचना व आदेश जारी करण्याची प्रक्रिया सुरु आहे.या निवडणुकीत पोलिसांची सोशल मीडियावर देखील करडी नजर असणार आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वाचे सर्वांनी पालन करावे असे आवाहन सोमनाथ घार्गे यांनी यावेळी केले.

## वाशी पुलावरून वाहतूक सुरू

**नवी मुंबई** : उड्डाणपुलाचे उद्घाटन करण्यात आले होते. परंतु उद्घाटन झाल्यानंतरही सोमवारी हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला नव्हता. मंगळवारी हा उड्डाणपूल सर्वांसाठी खुला करण्यात आल्याने वाहतूक चालकांनी समाधान व्यक्त केले असून या नव्या उड्डाणपुलमुळे या मार्गावरील नेहमीची वाहतूक कोडी फुटली आहे. त्यातच मुंबई परिसरातील पाचही टोलनाक्यांवर टोलमुक्ती केल्यामुळे होणारी वाहतूक कोंडी फुटली आहे. वाहने टोलमुक्तीमुळे सुसाट जात आहेत. टोल नाक्यावर मार्गिकांवर दररोज टोल वसुलीसाठी रांगा लागत होत्या. त्यामुळे काही मिनिटांच्या प्रवासासाठी वाहन चालकांना तासंतास टोल नाक्यावर ताटकळत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता.

## लोन देण्याच्या बहाण्याने १४ लाखांची फसवणूक

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

ॲक्सीस बँकेचे पर्सनल लोन देण्याच्या बहाण्याने १४ लाखांची फसवणूक करणाऱ्या दिल्लीच्या टोळीतील आरोपीला पनवेल सायबर सेल यांनी दिल्ली येथुन शिताफीने अटक केली.

फिर्यादी यांना ॲक्सीस बँकेतुन फोन केल्याचे भासवुन तसेच फिर्यादी यांचे व्हॉटसॲपवर ॲक्सीस बँक अधिकाऱ्याचे बनावट आयडी कार्ड पाठवून फिर्यादीचा विश्वास संपादन केला आणि नेट बँकींग हॅक करून फिर्यादीचे खात्यात ॲक्सीस बँकेचे १४ लाखाचे पर्सनल लोन घेऊन नंतर सदरचे लोन डिॲक्टीवेट करण्याच्या बहाण्याने फिर्यादी यांचे खात्यात जमा झालेली १४ लाखांची रक्कम इतर खात्यात वळवुन फिर्यादी यांची फसवणूक केली.या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सायबर सेल, पनवेलच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिपाली पाटील व पथकाने सदर गुन्हयातील बँक व्यवहार विश्लेषन आणि क्लिष्ट तांत्रिक विश्लेषण केले असता या गुन्हयातील संशयित आरोपीची टोळी हि दिल्ली येथुन ॲक्सीस बँक पर्सनल लोन फ्रॉड करीत असल्याचे निष्पन्न झाले. या आरोपीबाबत अधिक तपास केल्यानंतर गुन्ह्यातील एका आरोपीला दिल्ली येथून सापळा रचून अटक करण्यात आली. या गुन्हयात आणखी ३ पाहिजे आरोपी आहेत. फरार आरोपींचा शोध चालु आहे. अटक आरोपीकडे गुन्हयातील तांत्रिक पुरावे मिळुन आले असु या टोळीस यापुर्वी सायबराबाद पोलीसांनी क्रेडीट कार्ड फ्रॉडमध्ये २०२३ मध्ये अटक केली होती अशी माहिती मिळून आली आहे.

पान १ वरून

## ‘लढायचं की पाडायचं?’

मनोज जरांगे कोणती भूमिका घेणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष आहे. मंगळवारी (दि.१६) महायुती सरकारमधील सर्व पक्षांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. त्यानंतर मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी संवाद साधला. जरांगे पुढे म्हणाले की, २० तारखेच्या बैठकीत विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करायचे की, सरकारविरोधात लढायचे याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. जरांगे यांनी इच्छुक उमेदवारांसोबत चर्चेसाठी आज अंतरवाली सराटी येथे बैठक बोलावली आहे. त्यांनी आवाहन केले की, ज्यांना शक्य आहे त्यांनी या बैठकीत उपस्थित राहावे आणि मराठा समाजाच्या भविष्यातील दिशा ठरवण्यात आपला सहभाग द्यावा. दरम्यान, मनोज जरांगे यांनी सरकारवर टीका केली.देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करत त्यांनी म्हटले की, फडणवीस यांनी ओबीसींमध्ये १५ जातींचा समावेश करून मराठ्यांचे प्रमाणपत्र रोखले. गुन्हे दाखल केले. ज्यामुळे मराठा युवकांना नोकऱ्यांमध्ये प्रवेश मिळवणे कठीण झाले. फडणवीस यांनी दिलेले आश्वासन फसवे ठरले. जरांगे यांनी शेतकरी कर्जमाफी आणि नुकसानीच्या भरपाईच्या मुद्द्यांवरही सरकारवर टीका केली. शेतकऱ्यांना मिळालेल्या वाईट वागणुकीबद्दल त्यांनी सरकारला धारेवर धरले. तुम्हाला आमचे मुडदे बघायची सवय लागली आहे, असे म्हणत त्यांनी सरकारविरोधातील असंतोष व्यक्त केला. निर्णय झाल्यास मागे हटणार नाही, असेही जरांगे यांनी स्पष्ट केले.

## श्रीवर्धनमध्ये शिंदे गटाचे बंड

ज्येष्ठ नेते तुकाराम सुर्वे यांच्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला जनतेने निवडून दिले. त्यामुळे श्रीवर्धन मतदारसंघावर खरा हक्क शिवसेनेचा आहे. म्हणून शिवसेनेचा श्रीवर्धन मतदार संघावर दावा आहे असे घोसाळकर यांनी स्पष्ट केले.श्रीवर्धन मतदार संघाची उमेदवारी शिवसेनेला मिळावी, अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे. ही निवडणूक ताकदीने लढवून जिंकून येण्याची तयारीदेखील इच्छुक उमेदवारांनी केली आहे. महायुतीच्या सात जागा आम्हीच जिंकणार असं म्हटलं होत, मात्र कर्जत-खालापूर मतदारसंघात जर शिवसेनेला आव्हान दिल जातं असेल तर आम्ही श्रीवर्धन मतदारसंघात १०० टक्के निवडणूक लढविणार आहोत. शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख म्हणून मी स्वतः तसेच रोहा तालुका प्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदेदेखील विधानसभा लढविण्यास इच्छुक आहोत. आम्ही या मतदार संघावर दावा करीत असून आम्हाला उमेदवारी मिळावी, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पक्ष प्रतोद आ. भरत गोगावले यांच्याकडे इच्छा व्यक्त केली आहे.विकासकामांच्या बॅनरवर मुख्यमंत्री व पालकमंत्री यांचा फोटो लावला जातं नाही. भूमिपूजन, उद्घाटन कार्यक्रमास बोलवत नाहीत. शासकीय कार्यक्रमाचे निमंत्रण दिले जात नाही. विकासनिधी वाटपामध्ये देखील भेदभाव केला जातो, असा आरोप करीत शिवसेनेच्या पदाधिकारी यांनी नाराजी व्यक्त केली. २०१९ मध्ये विनोद घोसाळकर यांनी निवडणूक लढवली होती. त्यांना चांगले मताधिक्य मिळाले होते. मतदार संघात आमचा चांगला जनसंपर्क आहे. शिवाय शिवसेना पक्ष देखील संघटनात्मक दृष्ट्या मजबूत व बलाढय आहे. याचा आम्हाला फायदा होईल असे घोसाळकर म्हणाले. आदिती तटकरे या महायुतीच्या मंत्री आहेत. मात्र शिवसेनेला सावत्रपणाची वागणूक देत आहेत. यापूर्वी देखील ठाकरे शिवसेनेत असताना बंड झाले होते. त्याचीच पुनरावृत्ती होईल, यावर घोसाळकर म्हणाले की महायुतीचा धर्म सर्वांनी पाळला पाहिजे. अन्यथा आम्हीदेखील उमेदवार उभे करू, असे आव्हान घोसाळकर यांनी दिले आहे.

## महादेव जानकर सोडणार महायुतीची साथ

पक्षदेखील देशात मोठा पक्ष झाला पाहिजे. काँग्रेस आणि भाजपच्या बरोबरीने आला पाहिजे. त्यासाठी आम्ही स्वतंत्र लढणार आहोत. आमची ताकद किती आहे, ते पाहण्यासाठी आम्ही लढणार आहोत. आम्ही सर्व २८८ जागांवर लढणार आहोत,असे महादेव जानकर म्हणाले.

महायुतीबरोबर होतो, आता महायुतीबरोबर नाही. त्यांच्याबरोबर होतो तेव्हा त्यांनी लोकसभेला एक जागा दिली. अभिनंदन. आता आम्हाला आमची ताकद बघायची आहे. आमच्या पक्षाला मान्यता मिळवण्यासाठी कमीत कमी १२ आमदार किंवा २ खासदार निवडून आणणं आवश्यक आहे. निवडणूक आयोगाच्या अटी पूर्ण करण्यासाठी आम्हाला आमचे दहा ते पंधरा आमदार निवडून आणले पाहिजेत. त्यामुळे आमच्या पार्लमेंट्री बोर्डाने स्वतंत्र निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. एवढंच नाही तर झारखंड विधानसभा निवडणुकीतही आमचा पक्ष निवडणूक लढवणार असल्याचे महादेव जानकर यांनी सांगितले.

आमची महायुतीच्या नेत्यांसोबत जागावाटपाबाबत काहीच चर्चा नाही. त्यामुळे महायुती किंवा महाविकास आघाडी यांच्याबद्दल कोणतीही नाराजी नाही. आम्हाला आमच्या चौकात आमची औकात पाहायची आहे. त्यामुळे आम्ही स्वबळावर लढणार आहोत. महायुतीबरोबर आमचं काही नाही. त्यांचं आमचं संपलं आहे. आता सोबत जाण्याचा विचारच होऊ शकत नाही, अशी भूमिका महादेव जानकर यांनी मांडली.

## प्रशासनचे दुर्लक्ष; शासकीय जागेवर अतिक्रमण

यांनी अनेक वेळा अर्ज करून मागणी केली आहे. बारा गुंठे जागा असलेल्या या जमिनीची मोजणी करण्यात आली. त्याप्रमाणे प्रशासनाच्या हालचालीदेखील सुरु झाल्या. गट. नं.३३२ मध्ये शासनाकडे १२ गुंठेची मागणी केली होती. परंतु पाच गुंठे जागा मोजून दिली होती. मात्र ती जागा नाकारली. या जागेत सुशीला म्हात्रे यांनी बांधकाम केले आहे. त्यांना बांधकामाची परवानगी गट. नं. ३३१ मध्ये दिली असताना त्यांनी गट नं. ३३२ मध्ये बांधकाम केले आहे. त्यामुळे या जागेची मोजणी करण्यात यावी, ही मागणी प्राधान्याने आहे.हे बांधकाम त्वरित पाडून आठवडा बाजारासाठी जागा वर्ग करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ गेल्या अनेक वर्षापासून करीत आहेत. परंतु महसूल प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप प्रभाकर पिंगळे यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी केला आहे. या जागेत बांधकाम खुलेआम होत असतानाही प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे. बांधकाम थांबविण्याची मागणी होत असताना त्याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोपही केला जात आहे. आठवडा बाजाराची परंपरा अलिबाग तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये आहे. यातून स्थानिक शेतकऱ्यांनी पिकवलेल्या उत्पादनाला बाजारपेठ मिळते. स्थानिक व्यवसायिकांनादेखील एक रोजगाराचे साधन खुले होते. त्यामुळे आठवडा बाजार हे महत्वाचे मानले जाते. परंतु आठवडा बाजारासाठी जागेची मागणी करूनही ती जागा देण्यास प्रशासनाकडून टाळाटाळ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्या जागेवर धनदांडग्यांनी केलेल्या बांधकामाकडे मात्र अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याची संतप्त प्रतिक्रीया उमटत आहे.

## महामार्गावर भीषण अपघात

प्रदीप नारायण कासुर्डे हे मंडणगडहून मुंबईकडे जात होते. यावेळी चिकणी गावाच्या प्रवेशद्वारासमोर आले असता समोरुन चुकीच्या मार्गाने येणाऱ्या रोहा येथील गिरीश ट्रान्सपोर्टचा महिंद्रा कंपनीच्या टेम्पो चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून छोट्या टेम्पोला समोरुन जोरदार धडक दिली.

यावेळी छोट्या टेम्पोचे चालक प्रदीप कासुर्डे हे आतमध्येच अडकल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली. तसेच सहप्रवासी असलेल्या हसीना खलफे यांच्याही डोक्याला व हाता-पायाला गंभीर दुखापत झाली. त्यांना स्थानिकांच्या मदतीने नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचार केल्यानंतर अधिक उपचारासाठी पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात त्यांना पाठविण्यात आले. मात्र गंभीर दुखापती झाल्याने अत्यवस्थ असलेल्या प्रदीप कासुर्डे यांचा रुग्णालयात नेत असताना वाटेतच मृत्यू झाला. दरम्यान या अपघाताची माहिती मिळताच नागोठणे पोलीस ठाण्याचे सपोनि सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पो उपनिरीक्षक संजय चव्हाण व कर्मचारी तसेच ऐनघर महामार्ग पोलीस सपोनि गीतांजली जगताप आपल्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले होते.

## आचारसंहितेनंतरही शासनाकडून निर्णयांचा पाऊस

राज्य सरकारच्या वतीने शासन निर्णयासोबतच अनेक टेंडर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केले आहेत. यावरतीही निवडणूक आयोग आता कारवाईचा बडगा उचलणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने आचारसंहिता जाहीर केल्यानंतर शासनाला पत्रही लिहिलं होतं. पण निवडणूक आयोगाच्या निर्देशानंतर मंगळवारी आणि बुधवारीही अनेक निर्णय जारी करण्यात आले. त्यावर निवडणूक आयोगाने विचारणा केल्यानंतर हे सर्व निर्णय शासनाच्या वेबसाईटवरून काढण्यात आले. त्यानंतरही बुधवारी शासनाच्या वतीने अनेक वर्तमानपत्रात टेंडरच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यावर तक्रार प्राप्त झाल्यानंतर आता निवडणूक आयोगाकडून त्यावर कारवाई करण्याचे संकेत देण्यात आले.

## आंबिवली ग्रामपंचायतीची मनमानी सुरुच

उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. एकंदरीत एकीकडे भाजप सरकार लाडकी बहिण योजनेचं श्रेय घेऊन टिमकी वाजवत असतानाच आंबिवलीसारख्या गावात भाजपचा उपसरपंच लाडक्या बहिणींना पाण्याविना वणवण करायला लावत आहे. ही भाजपची दुतोंडी भूमिका सर्वसामान्यांना पटण्यासारखी नाही. येत्या निवडणुकीत त्याचा हिशोब ग्रामस्थ केल्याशिवाय राहणार नाहीत, असा सज्जड इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

आंबिवली ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा संदर्भात ग्रामसेविकेने केलेल्या वक्तव्याबाबत विस्तार अधिकारी प्रसाद म्हात्रे यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, जर ग्रामसेविकेने पाणीपट्टी भरा, तरच पाणी देऊ असे वक्तव्य केले असेल तर ते चुकीचे आहे. त्याबाबत त्यांना रितसर समज देऊ, असे प्रसाद म्हात्रे यांनी सांगितले.

नियमबाह्य पाणीपट्टी भरण्याबाबत व पाणी न देण्याबाबत केलेल्या वक्तव्याच्या संदर्भात ग्रामसेविका स्मिता घांगुर्डे यांच्याशी संपर्क केला असता, महिन्याला पाणीपट्टी भरणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत शासन निर्णय आहे का?असे विचारताच त्यावर त्यांनी नाही म्हणून सांगून ग्रामसभेचा ठराव असल्याचे सांगितले. तसेच पाणी देणार नाही, असे वक्तव्य केले नाही. गोंधळामध्ये कोणी वक्तव्य केले याकडे लक्ष नव्हते. पाणी देणे गरजेचे आहे; परंतू मी लोकप्रतिनिधींच्या विरुध्द बोलू शकत नाही, असे स्मिता घांगुर्डे म्हणाल्या.

## माथेरानची राणी नोव्हेंबरमध्ये येणार रुळावर

हा प्रवास करताना डोंगर-दऱ्यांना आव्हाने देत येणाऱ्या या गाडीतुन प्रवास करणे म्हणजे पर्यटकांना एक विलक्षण आनंद मिळतो. लहान मुलांना खऱ्या अर्थाने या गाडीची मजा घेता येते. त्यासाठी या मार्गावर फेऱ्या वाढविल्यास पर्यटनात वाढ होऊ शकते, असे पर्यटकांसह स्थानिक बोलत आहेत.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E- TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1. | e-Tender-20/ 24-25/Rfx No.7000034186 | Work of chimney height rising of tower legs on 400KV Nagothane- Padhgha 1 & 2 ckt under 400 kV line Maint s/dn Nagothane. | Limited to Rs. 25.00 | 22.10.2024 up to 23.59hrs |

**EMD Rs.** 1% of Estimate Cost & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in** Contact Person: Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in** Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

## अधिकाऱ्याच्या साथीने पतीच्या जमिनीवर कर्ज

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नौदल अधिकारी नोकरीनिमित्त देशाबाहेर असताना त्यांच्या पत्नीने त्यांच्या नावे असलेल्या जमिनीवर परस्पर कर्ज घेतले. हे कर्ज घेताना बँक अधिकारी आणि अन्य एका व्यक्तीला हाताशी धरले. याबाबत माहिती मिळताच अधिकाऱ्याने पत्नी आणि बँक अधिकाऱ्यांविरोधात तक्रार दाखल केली आहे. अमृता बोडखे या एसबीआय बँकेत कर्ज अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. नेहा या फिर्यादी विश्वास दलाल यांच्या पत्नी आहेत. तिन्ही आरोपींनी मिळून फिर्यादीच्या अपरोक्ष त्यांच्या पुणेनजीक हिंजेवाडी येथील जमिनीवर ४० लाखांचे संयुक्त गृहकर्ज घेतले.

## महाडमधील आरोग्य केंद्रातील सुरक्षा वाऱ्यावर

**। महाड । वार्ताहर ।**

सर्व सरकारी आस्थापनांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे, असे असताना रायगड जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या महाड तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी पाच केंद्रांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उपलब्ध नसल्याने आरोग्य केंद्रातील सुरक्षा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

काही दिवसांपासून राज्यासह देशात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांनमध्ये वाढ होत असतानाच, ज्या ठिकाणी महिलांचा वावर जास्त आहे अशा प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये देखील अशा पद्धतीची सुरक्षात्मक यंत्रणा आवश्यक असताना महाड तालुक्यातील आरोग्य केंद्रामध्ये ही यंत्रणा कार्यान्वित नसल्याची माहिती पुढे आली आहे.किल्ले रायगडच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड आरोग्य केंद्रामध्ये एका खासगी कंपनीमार्फत सीएसआरच्या माध्यमातून सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात आली आहे परंतु उर्वरित ठिकाणी ही समस्या कायम आहे.

महाड तालुक्यात दासगाव, वरंध, विन्हेरे, चिंभावे, पाचाड, बिरवाडी या ठिकाणी आरोग्य केंद्र असून पाचाड वगळता इतरत्र सीसीटीव्ही यंत्रणा नाही. तालुक्यातील आरोग्य केंद्रामध्ये प्रतिदिनी येणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षणीय असून या ठिकाणी प्रसूती केंद्राची देखील व्यवस्था असल्याने ग्रामीण भागातून येणाऱ्या विशेष करून महिला रुग्णांची संख्या जास्त आहे. तालुक्यातील विविध आरोग्य केंद्राच्या परिसरात असलेली पर्यटन क्षेत्रे व या मार्गावर होणाऱ्या अपघातांचे प्रमाण पाहता आरोग्य केंद्रात उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या वाढल्याचे ही दिसून येत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक असणारी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती या सर्व ठिकाणी करण्यात आली आहे, परंतु आरोग्य केंद्रामध्ये सीसीटीव्ही यंत्रणेला अजूनही प्राधान्य दिलेले दिसत नाही. याबाबत येथील आरोग्य विभागाकडून जिल्हा प्रशासनाकडे पत्रव्यवहार व मागणी करण्यात आली आहे. सरकारच्या वतीने अशा महत्त्वपूर्ण ठिकाणी या यंत्रणा असणे आवश्यक आहे अशा आरोग्य केंद्राच्या ठिकाणी देखील तातडीने शासनाने विशेष बाब म्हणून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासंदर्भात आदेश द्यावेत अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## सव्वाकोटी रुपयांची २० जणांची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

भारतील रेल्वे प्रशासनात कारकून या पदावर नोकरी लावण्याच्या बहाण्याने तब्बल २० जणांना गंडा घातल्याची घटना खारघर पोलीस ठाण्यात सोमवारी नोंदविण्यात आली. या प्रकरणी खारघर पोलीसांनी सहा जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदविला असून सध्या हा भामटा फरार आहे.

सूशिक्षित व क्रीडा क्षेत्रातील तरुणांच्या पालकांना गाठले. त्यांचा विश्वास संपादन केला आणि रेल्वेत कारकून म्हणून नोकरी लावतो असे भासवले. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराने १० लाख रुपये द्यावे लागतील, असेही सांगितले. लगेच नोकरी लागेल या अपेक्षेने पालकांनी संबंधित ४३ वर्षीय भामट्यावर विश्वास ठेवला. त्यानंतर या भामट्याने पालकांचा विश्वास दृढ होण्यासाठी रविवारी सुट्टीच्या दिवशी मुंबई चर्चगेट येथील रेल्वेच्या कार्यालयात पालकांच्या भेटीगाठी घेतल्या. रेल्वे कार्यालयातच भेट झाल्याने हा भामटा नोकरी लावेलच असा विश्वास पालकांना वाटल्याने त्यांनी भामट्याने दिलेल्या बँक खात्यावर आणि रोख रक्कम या भामट्याला दिली. त्यानंतर काही महिन्यांनी नोकरी कधी लागेल यासाठी भामट्याकडे विचारणा केली. मात्र तो अनेक कारणे देऊन नोकरी लावण्याचे टाळू लागला. अखेर पालकांना त्याच्यावर संशय आल्याने त्यांनी या भामट्याविषयी अधिक माहिती गोळा करण्याची सुरुवात केली. या भामट्याने स्वीकारलेल्या पैशातून त्याने कोल्हापूर येथील त्याच्या मूळ गावी घर बांधल्याचे पालकांना समजल्यावर पालकांनी भामट्याला दिलेले १ कोटी ३१ लाख रुपये परत मागण्याची सुरुवात केली. मात्र दिलेले पैसे परत मिळत नाहीत याची खात्री झाल्यावर खारघर पोलीस ठाण्यात पालकांनी सांगितले.

National Health Law Research Institute

**Raigad Institute of Nursing Education**

A/P- Walwati, Tal- Murud Janjira, Dist.- Raigad 402401

9028658792 / 9920261017/ 9819071198

Email: raigadine@gmail.com Website: - raigadine.co.in

**Admission For B.Sc. Nursing A.Y. 2024-25**

**Schedule of Institute round for state quota/institutional quota seats (15%)**

Applications are invited from eligible MH Nursing CET registered candidates for filling up residual seats under **state quota/institutional quota (15%)** in the prescribed formats as per following schedule.

| Sr.No. | Activity | Dates |
|---|---|---|
| 1 | Publication of seat matrix for institutional round & list of eligible candidates. | 17/10/2024 18/10/2024 |
| 2 | The eligible desirous candidate must apply in person/any person to respective college in prescribe format. | To 21/10/2024 up to 05.00pm |
| 3 | Publication of General Merit List and Quota Wise Merit list, Selection List-1 and Wait List separately at notice board and the web site of respective Colleges. | 22/10/2024 by06.00pm |
| 4 | Physical Joining and Filling Status Retention of candidates from Selection List-1 by submitting all Documents & payment of Requisite Fees by DD/ Cheque. | 23/10/2024to 25/10/2024 up to 05.30pm |
| 5 | Publication of Joined candidate list, Selection List-2 and wait list separately on the notice board and website of the respective college. | 25/10/2024 by06.30pm |
| 6 | Physical Joining and Filling Status Retention of candidates from Selection List-1 dated 25/10/2024 by submitting all original Documents & payment of Requisite Fees by DD/ Cheque. | 26/10/2024 To 28-10-2024 up to 05.30pm |
| 7 | Publication of Joined candidate list, Selection List-3 and wait list separately on the notice board and website of the respective college. | 28/10/2024 by06.30pm |
| 8 | Physical Joining and Filling Status Retention of candidates from Selection list-3 dated 28/10/2024 by submitting all original Documents & payment of Requisite Fees by DD/ Cheque. | 29/09/2024 to 30/10/2024 up to 05.30 pm |
| 9 | Publication of Residual vacancy and list of Joined Candidates on the on the Notice Board and website of the respective. | 31/10/2024 by06.30pm |
| 10 | Reporting of eligible candidates with Original Documents and Requisite Fees to college for Residual Vacancy. | 31/10/2024 01.00 pm onwards |
| 11 | Filling of Residual Vacancy from reported eligible candidates from list published on the website on the basis of merit. | 31/10/2024 02.30 pm onwards |
| 12 | Reporting of admitted candidates in College Feedback Module | 31/10/2024 Up t 11.59pm |
| 13 | Cut-off date of admission for B.Sc. Nursing Course for Academic Year 2024-25 | 31/10/2024 |

For Eligibility : Visit www.cetcell.mahacet.org and refer MH Nursing CET 2024 Information Brochure for details.

**Principal** **Secretary**

निवडक

## पनवेलमधील तरुणीचे अपहरण

**पनवेल :** राहत्या घरातून एका तरुणीस कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेल्याची घटना पनवेल तालुक्यातील पेठ गाव येथे घडली आहे. काजल राजेंद्र पासवान असे या तरुणीचे नाव असून रंग सावळा, चेहरा गोल, बांधा मध्यम, केस काळे लांब, नाक सरळ असून अंगात लाल रंगाचा पंजाबी ड्रेस व काळी ओढणी, पायात काळ्या रंगाची चप्पल आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा स.पो.निरीक्षक स्वप्नील केदार (९७६६४५४२४५) येथे संपर्क साधावा.

## अपघातातील जखमीचा मृत्यू

**पनवेल :** अर्जुन होला आपल्या दुचाकीवर एक महिला आणि तिच्या मुलाला पाठीमागे बसवून खोपोलीकडून पनवेलकडे विरुद्ध दिशेने भरधाव वेगाने जात होता. यावेळी दांड फाटा येथे अर्जुनने एका कारला समोरून जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीचालक व पाठीमागे बसलेली महिला आणि कारचालक तुषार तिरुके हे गंभीर जखमी होऊन बेशुद्ध झाले होते. या अपघातात महिलेचा ५ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाला. तर, जखमी अर्जुनवर खांदाकॉलनी येथे उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

## मद्याने भरलेला टेम्पो पलटी

**पनवेल :** एक टेम्पो जीएम मद्याच्या बाटल्यांचे बॉक्स भरून वसईहून पुणे येथे जात होता. यावेळी सायन-पनवेल महामार्गावर खारघर पोलीस स्टेशनच्या समोर या टेम्पोचे चाक फुटले आणि टेम्पो विरुद्ध दिशेला जात पलटी होऊन अपघात झाला. यात टेम्पोचे मोठे नुकसान झाले आहे. तर, जीएमच्या अनेक बाटल्या देखील फुटल्या असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवित हानी झाली नाही.

## गोडाऊनमधून मालाची चोरी

**पनवेल :** अनिकेत आमले हे हायरिंग डिपार्टमेंटचे डेप्युटी मॅनेजर या पदावर आहेत. किरवली, अडवली गाव, धानसर गाव फाटा मुंब्रा पनवेल रोड येथे पत्र्याचे शेडचे कंपनीचे गोडाऊन आहे. या ठिकाणी भाड्याने देण्यात येणारे सामान ठेवत असतात. या ठिकाणच्या कामगारांनी गोडाऊन मध्ये ठेवलेल्या मालापैकी काही माल दिसून आला नाही. यावेळी चोराने शेडच्या पत्र्याच्या खालील बाजूला असलेल्या मोकळ्या जागेतून आत प्रवेश करत गोडाऊनमध्ये ठेवलेल्या मालापैकी ६५ गोण्या मालाची चोरी केल्याचा प्रकार समोर आला.

## गाड्यांच्या मालकांचा शोध

**पनवेल :** पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घडलेल्या अपघाती, गुन्ह्यातील, बेवारस अशा १८९ वाहनांच्या मुळ मालकांचा शोध घेण्यात येत असून या संदर्भात त्यांनी पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने दुचाकी १२३, चारचाकी ५१, तीनचाकी १४, अवजड वाहने १ अशी एकूण १८९ वाहने अनेक वर्षांपासून पडून आहेत. या बेवारस वाहनांच्या मालकांनी वाहनांची कागदपत्रे दाखवून सात दिवसाच्या आत घेऊन जावेत अन्यथा पोलिसांकडून कायदेशीर प्रक्रिया करण्यात येणार आहे.

# ‘कृषीवल’ च्या दणक्याने प्रशासनाला जाग

## दस्तुरी नाका परिसर केला चकाचक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
**माथेरान या पर्यटन स्थळाची सर्व व्यवस्था माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेकडून केली जाते. मात्र, या पर्यटन स्थळी येण्यासाठी असलेले एकमेव प्रवेशद्वार हे अस्वच्छतेचे गर्तेत सापडले होते. याबाबतची दखल घेत ‘कृषीवल’ने मंगळवारी (दि.१५) ‘माथेरानच्या प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे ढीग’ अश मथळ्याची बातमी प्रकाशीत केली होती. यामुळे माथेरान परिषद खडबडून जागी झाली असून विशेष स्वच्छता मोहीम राबवून दस्तूरी नाका हा परिसर स्वच्छ केला आहे.**



कृषीवल इम्पॅक्ट



माथेरान प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे ढीग

। नेरळ । प्रतिनिधी ।
माथेरान शहरात येणारा पर्यटक हा दस्तुरी नाका येथे स्वतःच्या वाहनाने किंवा प्रवासी वाहनाने येत असतो. यामुळे दस्तूरी परिसराला माथेरानचे प्रवेशद्वार समजले जाते. मात्र, याच प्रवेशद्वारावर कचऱ्याचे ढीग आढळून येत असून जागोजागी पडून राहिलेला कचरा पाहिला की या भागातील कचरा उचलण्यासाठी नेमलेले तीन कर्मचारी काय करतात, असा प्रश्न निर्माण झाला



माथेरानमध्ये पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी वर्षाकाठी तब्बल १२ लाखाहून अधिक पर्यटक येत असतात. माथेरान शहरात येण्यासाठी सध्या दस्तुरी नाका हे एकमेव ठिकाण असून पर्यटकांना प्रवासी टॅक्सी आणि खासगी वाहने घेऊन आल्यावर दस्तूरी येथे उतरून पुढे माथेरान शहरात जावे लागते. या दस्तूरी नाका परिसराला माथेरान नगरपरिषदेच्या दुर्लक्षपणामुळे अस्वच्छतेचे स्वरूप प्राप्त झाले होते. अनेक महिने पडून राहिलेल्या कचरा कुजून जाण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने निर्माण झालेल्या दुर्गंधीमुळे पर्यटकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. तसेच, येथील अस्वच्छता बघून नगरपरिषदेला दूषणे देत होते.

माथेरान नगरपरिषदेकडून नेमण्यात आलेल्या तिन्ही कर्मचाऱ्यांकडून मुख्य रस्ता वगळता अन्य कोणत्याही भागात स्वच्छता केली जात नव्हती. याबाबत ‘कृषीवल’ने प्रकाशीत केलेल्या ‘माथेरानच्या प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे ढीग’ या बातमीमुळे खडबडून जाग आलेल्या माथेरान परिषदेने स्वच्छता मोहीम राबविली. परिषदेच्या स्वच्छता पथकाने ही मोहीम राबविताना सर्व स्वच्छता कर्मचारी यांच्या साहाय्याने दस्तूरी नाका परिसरातील रुग्णवाहिका मार्ग, वाहनतळ तसेच एमटीडीसी परिसरातील रस्त्यांच्या आजूबाजूला साठून राहिलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावली. यात प्रामुख्याने वाहनतळ भागात मोठ्या प्रमाणात मालवाहतूक करणारे साहित्य पडून राहिले असल्याने या परिसराला बकाल रूप आले होते.

यावेळी माथेराना नगरपरिषदेचे स्वच्छता निरीक्षक नरेंद्र सावंत यांनी या ठिकाणी स्वच्छता करण्यासाठी नेमणूक असलेले तीन कर्मचारी काय काम करतात, यासाठी येथे बसविण्यात आलेल्या सीसीटिव्ही कॅमेरांचा आधार घेतला जाईल, अशी माहिती या स्वच्छता मोहिमेनंतर त्यांनी दिली.



## लसणाचे भाव कडाडले

**। कर्जत । वार्ताहर ।**
कांदा पाठोपाठ आता लसणाचे भाव देखील गगनाला भिडले आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला चांगलीच कात्री लागली आहे. राज्यात कांद्याच्या मुद्द्यावरुन वातावरण तापले आहे. असे असताना लसणामुळे देखील डोकेदुखी वाढवणार आहे. कारण लसणाचे भाव किरकोळ बाजारात तब्बल ३६० ते ४०० रुपये किलोपर्यंत पोहोचले आहेत. प्रतिकूल हवामान आणि अवकाळी पावसाचा फटका पिकांवर पडल्याने पिकांच्या खराब उत्पादनामुळे लसणाच्या दरात वाढ झाल्याचे बोलले जात आहे. गेल्या काही महिन्यांपूर्वी २०० ते २५० रुपये किलो असलेला लसूण आता ३६० ते ४०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

ऐन दिवाळीत लसूण महागल्याने सर्व सामान्यांना थोडी महागाई सोसावी लागत आहे.

## महिला कर्मचाऱ्यांची कुचंबणा

### तलाठी कार्यालयात मुलभूत सुविधांचा अभाव

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत तालुक्यातील कळंब मंडळ कार्यालयांतर्गत येणाऱ्या वारे, कळंब, पोशीर, देवपाडा आणि सालोख या तलाठी सजेवर कार्यरत महिला कर्मचाऱ्यांना अत्यंत कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. शासकीय कार्यालयामध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. विशेषतः शौचालयाच्या अभावामुळे महिला कर्मचाऱ्यांची कुचंबना होत आहे.





ग्रामीण व आदिवासी भागात असलेल्या या तलाठी कार्यालयांमध्ये कोणत्याही प्रकारच्या सुविधांची व्यवस्था नाही. कार्यालयात पिण्याचे पाणी, नागरिकांसाठी बैठक व्यवस्था, तसेच वीज पुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधा देखील उपलब्ध नाहीत. यामुळे येथे कार्यरत कर्मचारी तसेच नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

काही महिन्यांपूर्वी या तलाठी कार्यालयाची नवीन इमारत बांधण्यात आली असली तरी शौचालयाची सोय करण्यात आलेली नाही. यामुळे महिला कर्मचाऱ्यांना दिवसभर काम करताना शारीरिक आणि मानसिक त्रासाचा सामना करावा लागत आहे. महिला कर्मचारी व नागरिकांच्या सुविधेसाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलणे आवश्यक आहे. शौचालयासारखी मूलभूत सुविधा नसणे हे प्रशासनाच्या दुर्लक्षाचे द्योतक आहे. यामुळे संबंधित विभागाने तातडीने आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

## तिकिट दरांमध्ये प्रचंड वाढ

**। कोलाड । वार्ताहर ।**
दिवाळीच्या आगमनापूर्वी खासगी प्रवासी बस चालकांकडून पुन्हा तिकिट दरांमध्ये वाढ करत प्रवाशांची लूट चालू झाली आहे. सुट्ट्या आणि सण यांच्या काळात प्रवासासाठी अधिक तिकिट दराचा भुर्दंड भरावा लागणारच, अशी धारणा सर्वसामान्यांची झाली आहे. ही प्रवाशांची लूट केव्हा थांबणार, असा सवाल हिंदु जनजागृती समितीच्या ‘सुराज्य अभियाना’चे महाराष्ट्र राज्य समन्वयक अभिषेक मुरुकटे यांनी केला आहे.

## कुणबी समाजाचा एल्गार

**। तळा । वार्ताहर ।**
जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याचा आग्रह धरल्याने कुणबी समाजात अस्वस्थता निर्माण झाली असून समाजाच्या सर्व शाखीय संघटना याविरोधात आक्रमक झाल्या आहेत. मराठा समाजाला ओबीसी करण्यासाठी मराठा समाजाच्या सगे-सोयऱ्यांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची अधिसूचना अंतिम करण्याच्या शासनाच्या निर्णया विरोधात कुणबी समाजोन्नती संघ मुंबई व कुणबी समाज संघ ग्रामीण शाखा तळा एकत्र येत तहसीलदार स्वाती पाटील यांना निवेदन सादर करण्यात आले. यापुर्वी सगे-सोयरे अधिसुचनेच्या मुद्याला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलेले आहे. राज्य सरकारने मराठा जातीसाठी स्वतंत्र कायदा करून त्यांना एस.इबी.सी. म्हणून १०% स्वतंत्र आरक्षण दिलेले आहे. सबब सगे-सोयरे बाबतच्या अधिसूचनेचा अट्टाहास चुकीचा आहे. तसेच, कुणबी नोंदीच्या आधारे देण्यात आलेल्या जातीच्या दाखल्याबाबत शासनाने श्वेतपत्रिका काढावी व बोगस दाखल्याची चौकशी करून ते जातीचे दाखले रद्द करावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## वाचन प्रेरणा दिन साजरा

**। अलिबाग । वार्ताहर ।**
डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी मंगळवारी (दि.१५) चेंढरे येथील स्वामी समर्थ सार्वजनिक ग्रंथालयात ‘वाचन प्रेरणा दिन’ साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन व डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. दीप्ती जोशी-कुलकर्णी यांनी स्वरचित कवितांचे वाचन केले. श्रुती राजे यांनी व्याख्यान केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दीप्ती कुलकर्णी व गुळवणी यांनी परिश्रम घेतले.

## ‘आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर’

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
अलिबाग विधानसभा मतदार संघाची निवडणूक जाहीर झाली आहे. आदर्श आचारसंहिता लागू झाली असून मतदान २० नोव्हेंबर आणि मतमोजणी २३ नोव्हेंबरला होणार होणार आहे. निवडणूक पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडावी यासाठी आचारसंहितेच्या काटेकोर व प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्यात येणार असल्याची माहिती अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी दिली. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी पत्रकार परिषद बुधवारी (दि.१६) घेतली होती. यावेळी ते बोलत होते.



यावेळी अलिबागचे उपविभागीय पोलीस अधिकारी विनीत चौधरी, पोलीस निरीक्षक किशोर साळे, रेवदंड्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले आदी उपस्थित होते.

चव्हाण यांनी सांगितले की, १९२ अलिबाग विधानसभा मतदार संघात तीन लाख तीन हजार ७८९ मतदार आहेत. त्यामध्ये ३ लाख ४९ हजार ५५९ पुरुष व १ लाख ५४ हजार २३० महिला मतदारांचा समावेश आहे. या मतदार संघातील ३७५ मतदान केंद्रांवर मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. यात अलिबागमध्ये २६६, मुरूडमध्ये ७२ व रोह्यामध्ये ३७ केंद्र असून अलिबाग व मुरुडमध्ये प्रत्येकी एक अशी दोन केंद्राची वाढ झाली आहे. निवडणूक प्रक्रीया सुरळीत पार पाडण्यासाठी राखीव कर्मचाऱ्यांसह १ हजार ९६७ कर्मचारी आहेत. यामध्ये १ हजार ५०० हून अधिक कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. शाळा, महाविद्यालय, आशा सेविका, बचत गट व इतर यंत्रणेमार्फत मतदान जनजागृती केली जाणार आहे. उमेदवारी अर्ज २२ ते २९ ऑक्टोबर या कालावधीत दाखल करणे, अर्जाची छाननी ३० ऑक्टोबरला, ४ नोव्हेंबरला उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द केली जाणार असल्याची माहिती मुकेश चव्हाण यांनी दिली.

## उरण परिसरात रानडुकरांचा हैदोस

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
भात पिके तयार होण्याच्या अखेरच्या वेळेला दररोज सायंकाळी परतीच्या पावसाने बरसायला सुरुवात केल्याने पिके संकटात सापडली आहेत. या संकटात सापडलेल्या भात पिकांकडे आता जंगली रानडुकरांची वक्रदृष्टी असल्याने भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ लागले आहे.

उरण परिसरातील भातशेती कापणीला आली असताना शेतात रानडुकरांचा हैदोस सुरू झाला असल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास कळपाने पिकांवर हल्ला करणारी रानडुकरे हिरावून नेत असल्याने रानडुकरांचा वनविभागाने बंदोबस्त



करावा, अशी मागणी चिरनेर, कळंबुसरे, कोप्रोली, आवरे, साई, दिघाटी परिसरातील शेतकरी वर्गातून होत आहे.

यंदा लावणीसाठी पाऊस उत्तम झाला. मात्र, यानंतर पिके तयार होण्याच्या वेळेला आणि भात कापणीच्या हंगामात परतीच्या पावसाने रंग दाखवायला सुरुवात केल्याने येथील शेतीवर संकट आले आहे. ऐन कापणीच्या मोसमात पाऊस दररोज सायंकाळी हजेरी लावत असल्यामुळे तयार भात पिके घरी आणायची तरी कशी? हा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत असून, शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. यातच रानडुकरांचे संकट उभे ठाकले आहे.

या पिकलेल्या शेतीची नासाडी करण्यासाठी येणाऱ्या रानडुकरांना पळवून लावण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रभर शेताची राखण करावी लागत आहे. भात पिकांचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या प्रतिकारात रानडुक्कर मेल्यास शेतकऱ्याविरुद्ध शिकारीचा गुन्हा दाखल होत असल्याने कोणीही असा प्रतिकार अथवा बंदोबस्त करण्याच्या मनस्थिती दिसून येत नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या शेताची नासधूस होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे.

## कलोते धरणाचे पाणी दुषित



### लहान मुलांना कावीळची लागण

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**
ग्रुप ग्रामपंचायत कलोते रायती येथे मोठे धरण असून या माध्यमातून येथील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला जात आहे. मात्र, या ठिकाणी पाळीव प्राणी पाळले जात असल्यामुळे त्यांचे मलमुत्र, विष्ठा या पाण्यांत मिसळले जात आहे. यामुळे हे पाणी दिवसेंदिवस दुषीत होत चालले आहे. हेच पाणी या परिसरातील ग्रामस्थ पिण्यासाठी वापरत असल्यामुळे येथिल २० ते २५ लहान मुलांना कावीळची लागण झालेली आहे.

पुर्वी या कलोते धरणाचे पाणी शुद्ध होते. मात्र, गेल्या काही वर्षामध्ये या ठिकाणी धनिकांनी येथिल शेतकरी वर्गांच्या जागा घेऊन शेतघरे बांधली असून उंट, गाय, विविध जातीचे कुत्रे, घोडा, ससे, मांजर पाळले आहेत. तसेच, याच ठिकाणी आजारी प्राण्यांवर उपचार केले जातात. तर, काही प्राण्यांचे मलमुत्र व विष्ठा हे या धरणाच्या संपर्कात येत असल्यामुळे दिवसेंदिवस पाणी दुषित होत चालले आहे. विषेश म्हणजे ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय याच गावात असून याकडे साफ दुर्लक्ष्य करत आहे.

या परिसरातील स्थानिक कार्यकर्त्यांचा पाठबळ असल्यामुळे कुणालाही न जुमानता राजरोसपणे येथे पाळीव प्राण्यांचा व्यवसाय सुरु आहे. या संदर्भात येथिल ग्रास्थ अक्रमक झाले असून शासकिय पातळीवर निवेदन देण्यात आले आहे. मात्र, या धरणावर धनिकांची वक्र दृष्टि असल्यामुळे पिण्याच्या पाण्याला ग्रहण लागले असल्यांचे समोर आले आहे.

### जिल्हा सामान्य रुग्णालयाचा स्तूत्य उपक्रम

## मानसिक आरोग्य विषयक जनजागृती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
**चिंता, नैराश्यामुळे एकलकोंडेपणा निर्माण होणे, आत्महत्या करणे अशा अनेक घटना घडण्याची भिती समाजात निर्माण झाली आहे. या मानसिक आजारापासून मुक्त करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातील जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम मानसोपचार विभागामाच्यावतीने मानसिक आरोग्य विषयक जनजागृती करण्यात आली. या निमित्ताने गेल्या आठ दिवसांपासून विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.**



आठ दिवसांच्या जागतिक मानसिक आरोग्य सप्ताह निमित्ताने अलिबाग शहरात दि. १० ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जनजागृतीपर प्रभातफेरी काढण्यात आली. पेण उपजिल्हा रुणालयात वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी वर्गासाठी कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य कसे जपावे, याबद्दल डॉ. अर्चना सिंह यांचे व्याख्यान घेण्यात आले. जिल्हा रूग्णालय अलिबाग येथील नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी पोस्टर व रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. बक्षीस वितरण अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी, डॉ. निशिकांत पाटील, डॉ. अमोल शिंदे, कार्यालय अधिक्षक राजेश किणी यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

तसेच, थळ येथील आरसीएफ कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी 'ताणतणाव व्यवस्थापन तंत्र' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील अधिष्ठाता कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी ‘ताणतणाव व्यवस्थापन’ या विषयावर मानसोपचार तज्ञ डॉ. अर्चना सिंह यांनी कार्यशाळेच्या माध्यमातून मोलाचे मार्गदर्शन केले.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शनानुसार आणि सहकार्याने मानसोपचार तज्ज्ञ तथा जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अधिकारी डॉ. अर्चना सिंह, प्रफुल्ला कांबळे, धनेश्वरी कडू, विशाल दामोदरे, राजेश पवार, तेजश्री पाटील, काजल राठोड, मंगेश म्हात्रे, नवनाथ घरत, मानसोपचार विभागाचे सर्व कर्मचारी व जिल्हा रुग्णालय अलिबाग यांनी या कार्यक्रमांसाठी आणि सप्ताह यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# शंखनाद आणि ऐलान

विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजल्यानंतर महायुतीने बुधवारी आपला लेखाजोखा सादर केला. गेल्या महिनाभरात हे सरकार भयंकरच कामाला लागले. सतत मंत्रिमंडळ बैठका घेतल्या. त्यानंतर शेकडो घोषणा केल्या. या घोषणा आणि पत्रकार परिषदा म्हणजेच आपले काम असल्याचे महायुतीवाल्यांना वाटत आहे. यातले बहुसंख्य निर्णय कागदावर आहेत. त्यातल्या कित्येकांसाठी आर्थिक तरतूद कोठून होणार याचा पत्ता नाही. इतकी महामंडळे स्थापन केली आहेत त्यांना बसायला जागा द्यायची देखील पंचाईत होईल अशी अवस्था आहे. यापूर्वीच्या महामंडळांचा तसा अनुभव आहेच. पुण्यातल्या मेट्रो रेल प्रकल्पांना राज्य सरकारने मान्यता दिली आहे. यानंतर हा प्रस्ताव केंद्राकडे जाईल व नंतर त्याचे भवितव्य ठरेल. तरीही आव असा आणला जातो आहे की, जणू नवीन मेट्रो रेल्वे सुरु झाली. ही जाहिरातबाजी करावी लागते कारण सरकारने दोन वर्षात काहीही केलेले नाही. यापूर्वी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर असेच काही निर्णय घेण्यात आले. पण जनतेने त्यांना धूप घातली नाही. त्यावेळी जनमत आपल्या विरोधात आहे हे लक्षात येताच पैशांचा पाऊस पाडण्यास सुरूवात झाली. आपल्या पक्षातील आमदारांना शेकडो कोटींचा निधी दिला गेला. नंतर लाडकी बहीणसारख्या योजना आणण्यात आल्या. या एका योजनेने राज्याचे कंबरडे मोडेल अशी अवस्था आहे. याच रीतीने पैसे खर्च होत राहिले तर पुढील वर्षी मार्चच्या अगोदर राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार द्यायलाही पैसे नसतील असा इशारा काही सनदी अधिकारी खासगीत देत आहेत. अर्थात तो ऐकण्याच्या अवस्थेत कोणी नाही. कारण, काय वाटेल ते करून पुन्हा सत्तेत येणे हे धोरण आहे. यापूर्वी हिंदी प्रदेशातील राज्यांच्या निवडणुकांच्या वेळी तिथले काँग्रेस सरकार रेवडी वाटत असल्याबद्दल नरेंद्र मोदींनी चिंता व्यक्त केली होती. आश्चर्य म्हणजे, न्यायालयानेही तेव्हा याबाबत धोरण ठरवायला हवे वगैरे मते मांडली होती.

### दादांच्या भूमिकेकडे लक्ष

आता महाराष्ट्रात ही जी सरकारी उधळपट्टी होते आहे त्याबाबत न्यायालयाने डोळ्यावर पट्टी बांधली आहे. निवडणूक आयोग गप्प आहे. मोदी तर उलट शिंदे यांची तारीफ करीत आहेत. जनता या पैशांच्या तथाकथित पुरामध्ये वाहून जाणार की डोके ताळ्यावर ठेवून मतदान करणार हा खरा प्रश्न आहे. राज्यातील जनतेने यापूर्वी सूज्ञपणा दाखवला आहे व ती याहीवेळी तो दाखवील असा आम्हाला विश्वास आहे. अर्थात महायुतीवाल्यांना याचीच भीती वाटते आहे. त्यामुळे इतक्या सर्व घोषणाबाजीनंतरही यांचे हिंदू विरुध्द मुस्लिम करणे थांबलेले आहे. काल निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी शंखनाद केला. आज त्याविषयी बोलताना ते म्हणाले की आमचा शंखनाद आहे तर विरोधकांचा ऐलान आहे. हेच फडणवीस काही दिवसांपूर्वी राज्यातील मुस्लिमांवर व्होट जिहाद करीत असल्याचा आरोप करीत होते. घटनात्मक पदावर बसलेल्यांनी व साधनशुचितेची शपथ घेतलेल्यांनी ही समाजात विद्वेष पसरवणारी भाषा वापरावी हे अत्यंत आक्षेपार्ह आहे. खरे तर याविरुध्द न्यायालयात खटलेच दाखल करायला हवेत. पण सध्या ते कोण करणार आणि न्यायालयात न्याय कधी होणार असा प्रश्न आहे. येत्या प्रचाराच्या काळात आता महायुतीचे नेते अधिकाधिक अशी भाषा वापरणार हे देवेंद्रांच्या आजच्या वक्तव्यावरून दिसते. अर्थात यात नवल नाही. नितेश राणे मुस्लिम समाजाला खुलेआम वाटेल त्या धमक्या देत असताना हेच देवेंद्र त्यांना हिंदू समाजासाठी चांगले काम करीत असल्याचे प्रमाणपत्र देत होते. मते मिळवण्याच्या हव्यासापायी देवेंद्र आणि शिंदे कोणत्या थराला जाणार आहेत याची ही सर्व चुणूक आहे. प्रश्न असा आहे की, त्यांच्या बाजूला बसणाऱ्या अजितदादांचे याबाबत काय म्हणणे आहे? आपण सेक्यूलर आहोत व आपण आपली तत्वे सोडलेली नाहीत एवढेच परत परत सांगून उपयोगाचे नाही. एक जबाबदार मंत्री व नेते म्हणून त्यांनी आपल्या सहकारी नेत्यांना काही गोष्टी स्पष्ट बजावायला हव्यात.

### एकच उद्दिष्ट

महाविकास आघाडीला पुन्हा एकदा ठामपणे याचा मुकाबला करावा लागणार आहे. त्यासाठी आपले जागावाटप लवकर संपवून प्रचाराची रणनीती त्यांनी ठरवायला हवी. सध्या युती व आघाडी हे दोन्ही गट एकमेकांच्या जागावाटपावर लक्ष ठेवून आहेत. समोर कोणत्या पक्षाचा व कोण उमेदवार दिला जातो त्यानुसार आपला उमेदवार ठरवण्याचे हे डावपेच आहेत. त्यामुळे जागावाटप व उमेदवारांच्या यादीची घोषणा बरीच उशिरापर्यंत लांबेल अशी शक्यता आहे. चार नोव्हेंबरला अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. कदाचित त्या दिवसापर्यंत हे सर्व घोळ चालू राहतील. मात्र आघाडीच्या नेत्यांनी आपला प्रचार लवकरात लवकर सुरू करायला हवा. दरम्यान, डाव्या व प्रागतिक आघाडीच्या बैठकीत काही मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यांचा आघाडीतर्फे योग्य तो विचार होण्याचीही गरज आहे. लोकसभेला मिळालेल्या यशामध्ये प्रागतिक पक्षांचा मोठा वाटा आहे. त्यावेळी विधानसभेला जास्त जागा सोडण्याचे आश्वासन नेत्यांनी दिले होते. आता त्याची पूर्तता करण्याची वेळ आलेली आहे. आता आश्वासनभंग केल्यास जनतेत चुकीचा संदेश जाईल व त्याचा फटका सर्वांनाच बसेल. २०२४ ची निवडणूक ही सेक्यूलर व प्रागतिक शक्तींच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. आघाडीने हे ओळखून हे वाटपही लवकर मार्गी लावायला हवे. जनता आपल्या बाजूला आहेच अशा गैरसमजात राहणे धोक्याचे ठरेल. योग्य उमेदवार आणि प्रचाराची योग्य दिशा अत्यंत आवश्यक आहेत. यासाठी इंडी आघाडीतील पक्षांनी लोकसभेप्रमाणे एक बैठक घेऊन संयुक्त निवेदन करणे उपयोगाचे ठरेल. त्यातून जनतेला एक विश्वास मिळू शकेल. महायुतीवाले हिंदू विरुध्द मुस्लिम अशी जी पेटवापेटवी करू पाहत आहेत त्यालाही चोख जबाब देण्याची गरज आहे. वेळ थोडा आहे. संसाधने कमी आहेत. उद्दिष्ट मोठे आहे. पण उद्याच्या महाराष्ट्राच्या भल्यासाठी जिवापाड कष्ट करून ती साध्य करावीच लागणार आहेत.

विचार

# निवडणुकीचे रण पेटले

*अखेर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्याने राजकीय रण पेटले आहे. राज्याच्या इतिहासात सर्वाधिक गोंधळाची आणि चुरशीची ठरणारी ही निवडणूक अवघ्या देशाच्या कुतुहलाचे केंद्र ठरत आहे. गेली पाच वर्षे राज्यात फाटाफुटीचे, विश्वासघाताचे आणि शह-काटशहाचे राजकारण अनुभवणाऱ्या जनतेचे या निवडणुकीच्या निमित्ताने समोर येणारे मनोगत विशेष महत्वाचे असणार आहे.*



प्रा. अशोक ढगे

विधानसभेची निवडणूक कधी जाहीर होते, याकडे राजकीय पक्षांचे आणि जनतेचे लक्ष लागले होते. अखेर लोकसभेची निवडणूक जाहीर झाली. निवडणूक आयोगाने महाराष्ट्रात एकाच टप्प्यात तर झारखंडमध्ये दोन टप्प्यांमध्ये मतदान घेण्याचे जाहीर केले. विधानसभा निवडणूक एकाच टप्प्यात घेणाऱ्या निवडणूक आयोगाला लोकसभा निवडणूक मात्र पाच टप्प्यात घ्यावी लागली होती. निवडणूक आयोग सत्ताधारी पक्षाच्या हातचे बाहुले असल्याचा आरोप करण्याची संधी आयोग आपल्या कृतीतून देत असते, ते असे. विविध उमेदवारांना, पक्षांना साधर्म्य असणारे चिन्ह देऊ नये, असा साधा नियम असताना त्यातून पळवाटा काढण्याचे काम निवडणूक आयोग करतो. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज भरण्याचे दिवस कमी केले आहेत. तसेच प्रचारालाही कमी वेळ मिळणार आहे. वंचित आघाडीने उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आघाडी घेतली असली तरी महाविकास आघाडी आणि महायुती या दोन प्रमुख आघाड्यांच्या जागावाटपावर अद्याप शिक्कामोर्तब झालेले नाही. त्यामुळे उमेदवारांची नावेही ठरलेली नाहीत. आता मात्र राज्यातील या दोन प्रमुख आघाड्यांना जागावाटप आणि उमेदवार यादी जाहीर करण्याची घाई करावी लागेल. त्याचे कारण आजपासून बरोबर १४ दिवसांमध्ये राजकीय पक्षांना निवडणुकीच्या मैदानात उतरावे लागेल. महाराष्ट्रात २० नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात विधानसभा निवडणुकांसाठी मतदान होत असून २३ नोव्हेंबर रोजी निवडणुकांचा निकाल लागणार आहे. झारखंड या राज्यात नक्षलवादी संघटनांचा उपद्रव लक्षात घेऊन दोन टप्प्यांत मतदान ठेवले आहे. महाराष्ट्र आणि झारखंडची मतमोजणी एकाच दिवशी होणार आहे.

दिल्ली विधानसभेची मुदतही फेब्रुवारीमध्ये संपते आहे. तिथल्या सरकारने महाराष्ट्र आणि झारखंडबरोबर निवडणूक घेण्याची मागणी केली होती; परंतु 'एक देश, एक निवडणूक' धोरणाचा पुरस्कार करणारे केंद्र सरकार आणि त्यांचा निवडणूक आयोग साध्या चार राज्यांच्या निवडणुकाही एकाच वेळी घेत नाही, हे पुन्हा एकदा अनुभवाला आले आहे. विधानसभेच्या निवडणुका दिवाळीनंतर होणार असल्याने यंदा राज्यात दोन वेळा दिवाळी साजरी होणार आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकांच्या तुलनेत यंदा एक महिना उशिराने निवडणुका पार पडत आहेत. विधानसभेच्या इच्छुक उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी केवळ १५ दिवसांमध्ये तयारी करावी लागणार आहे. कारण, २९ ऑक्टोबर ही अर्ज भरण्याची अंतिम तारीख देण्यात आली आहे तर ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेता येतील. त्यामुळे राजकीय पक्षांना लवकरात लवकर उमेदवारांची घोषणा करावी लागेल. लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना रंगण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीत उमेदवार लवकर जाहीर करण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न आहे. महाविकास आघाडीचे जवळपास ८० टक्के जागावाटप निश्चित झाले आहे. लोकसभेला शिवसेना ठाकरे गटाने महाविकास आघाडीत सर्वाधिक जागा लढवल्या होत्या. त्या खालोखाल काँग्रेस, शरद पवार गटाला जागा सुटल्या होत्या; पण लोकसभेतील कामगिरी पाहता विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या वाट्याला अधिक जागा येणार आहेत.

या निवडणुकीत काँग्रेस ११९ जागा लढवेल. ठाकरेंची शिवसेना ८६, तर शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस ७५ जागांवर लढेल. लहान पक्षांना सात जागा सोडण्यात आल्या आहेत. पैकी शेकापला तीन, समाजवादी पक्षाला दोन आणि माकपला दोन जागा दिल्या जाणार आहेत. राज्यात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहेत. यातील २२२ जागांवर महाविकास आघाडीमध्ये एकमत झाले आहे. मुंबईतील २३ जागा ठाकरे गटाला, आठ जागा काँग्रेसला तर एक जागा समाजवादी पक्षाला सोडण्यात येणार आहे. महायुतीमध्ये भाजप १६० च्या आसपास, शिंदे गट ६० च्या आसपास तर अजित पवार गट ५० च्या आसपास जागा लढवेल, असे चित्र आहे. कमी मतदारसंघांमध्ये लढताना निवडून येण्याची शक्यताही कमी राहते. आता प्रत्यक्ष किती मतदान होईल यावरही बरेच काही अवलंबून असेल. यात एमआयएमचाही विचार करावा लागेल. जरांगे पाटील स्वत: उमेदवार उभे करणार नसले तरी ते कोणाला पाडण्यासाठी प्रयत्न करणार हे बघावे लागेल. या सगळ्याबरोबरीने मतदारसंघांचे मायक्रो मॅनेजमेंट करण्याची पक्षांची यंत्रणाही महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसेल. काही प्रमाणात ठाकरेंकडे ती आहे. भाजपाकडे तर मोठ्या प्रमाणात आहे. काँग्रेसकडे ती फारशी दिसत नाही, कारण बुथ लेव्हलवर काम करणारे लोक त्यांच्याकडे कमी आहेत. त्यांचा आमदार नसणाऱ्या मतदारसंघात जाऊन मतदारांना बाहेर काढणाऱ्या स्वयंसेवकांच्या, कार्यकर्त्यांच्या भाजपासारख्या हुकमी यंत्रणेचा त्यांच्याकडे अभाव आहे.

अलिकडेच हरियाणामध्ये भाजपा तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करु शकला. अर्थातच यामागे त्यांनी घेतलेले महत्त्वाचे निर्णय आणि पक्षबांधणीचा मोठा वाटा होता. त्याच चालीवर इथेही भाजपाने पक्षाची बांधणी केलेली दिसते. भाजपाने लोकसभेच्या निवडणुकीत जाणवलेल्या नकारात्मक गोष्टी दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. याचाच एक भाग म्हणून त्यांनी लहानलहान जातींची जवळपास १८-१९ आर्थिक विकास महामंडळे दिली आहेत. सर्वात मोठा, पारडे जड करणारा निर्णय लाडकी बहीण योजना मोठा घटक ठरू शकतो. विरोधी पक्षांकडून होणारी टीका पाहता, त्यांनाही याचे महत्त्व जाणवल्याचे स्पष्ट दिसते. काँग्रेसचे नेते महिलांना दरमहा ३००० रुपये देण्याचे आश्वासन देत आहेत. ही बाब या योजनेचा महायुतीला होणारा फायदा स्पष्ट करणारी आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात अनेक राजकीय भूकंप झाले. सर्वात आधी शिवसेनेतील अंतर्गत बंडाळी, त्यानंतर सत्तेत असलेले महाविकास आघाडी सरकार कोसळणे, शिंदे यांनी भाजपच्या साथीने महायुती सरकार स्थापन करून स्वतः मुख्यमंत्रिपदी विराजमान होणे, त्यानंतर अजित पवार यांच्या बंडानंतरची राष्ट्रवादीतील फूट तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी अनुक्रमे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर ठोकलेला दावा या सर्व घडामोडी राज्याच्या राजकारणाला हादरे देणाऱ्या ठरल्या. त्यामुळे मतदारराजा या वेळी राज्याचे सिंहासन कुणाच्या हवाली करणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

या निवडणुकीमध्ये पिपाणीचा पुन्हा तुतारीला फटका बसण्याची शक्यता आहे. तुतारी हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे चिन्ह आहे; मात्र लोकसभा निवडणुकीत पिपाणीमुळे तुतारीला फटका बसल्याची तक्रार शरद पवार गटाने केली होती. लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दहा जागा लढवल्या. तेव्हा चार लाखांहून अधिक मतदान पिपाणी या चिन्हाला पडले होते. विशेषतः सातारा मतदारसंघात या चिन्हामुळे त्यांच्या उमेदवाराला पराभवाचे तोंड पहावे लागले होते. त्यामुळे संभाव्य धोका लक्षात घेऊन शरद पवार गटाने पिपाणी चिन्ह गोठवण्यासाठी निवडणूक आयोगाकडे धाव घेतली होती; मात्र निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीत पिपाणी हे चिन्ह कायम ठेवले. तुतारी वाजवणारा माणूस लहान आणि अस्पष्ट दिसतो. त्याचा आकार वाढवण्यात यावा ही मागणी मात्र आयोगाने मान्य केली. आगामी विधानसभा निवडणूक आणि तिचे निकाल हे इतिहासाच्या पानांवर ठळकपणाने नोंदले जाणार आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही वर्षांमध्ये घडले, ते अनेक दशकांपासून घडले नव्हते. महाराष्ट्राला एक चांगली राजकीय संस्कृती आहे, असे सुरूवातीपासून मानले जात आहे. असे असले, तरी या राजकीय संस्कृतीला आता खरेच गालबोट लागले आहे का, राजकारणात घडलेल्या घडामोडींवर लोकांचा रोष आहे का हे आता निवडणुकीतून समोर येणार आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुती सरकारच्या प्रचारात विकासकामे, लाडकी बहीण योजनांसारख्या विविध मोठ्या घोषणा केंद्रस्थानी राहतील, तर महाविकास आघाडीच्या प्रचारात पक्षफोडीचा तसेच सर्वधर्मसमभावाचा मुद्दा महत्त्वाचा ठरू शकतो.

आजकाल

# महानायक

प्रभाकर पिंगळे

सिनेसृष्टीतील राजेश खन्ना हा पहिला महानायक त्याच्या बाबतीत एक भावस्पर्शी गोष्ट सांगितली आहे. महानायकाला ही कशा मर्यादा येतात याची त्यातून प्रचिती येते. कारकिर्दीच्या ऐन भरात असताना रोज त्याचा दरबार भरत असे. त्याचे चाहते त्याच्या चित्रपटातील संवाद त्याच्याच तोंडून ऐकण्यासाठी गर्दी करीत. ज्या हॉटेलमध्ये दरबार भरे तेथे खच्चून गर्दी आणि मध्याची रेलचेल असे.

काही वर्षात तो हॉल रिकामा दिसू लागला तेव्हा राजेश खन्नाने एका जवळच्याला विचारले सगळे लोक गेले कुठे? तो नम्रपणे म्हणाला अमिताभ बच्चन नावाचा आणखी एक नायक उदयास आला आहे. या उत्तराने राजेश खन्ना दिवा स्वप्नातून खाडकन बाहेर आला. जो स्वतःची कौशल्य ओळखतो अशा नायकाचे नुकसान होत नाही. राजकारणात शाश्वत असे काही नसते. सत्ताही नाही. जनतेचा विश्वास कमावणे ही सहज साध्य गोष्ट नाही. प्रतिस्पर्ध्याने विश्वास बाळगावा हा कुठल्याही नेत्यासाठी यशाचा मोठा टप्पा असतो., टोकाचा अतिरेक कामाचा नाही. त्यातून राज्यपद्धतीलाच आव्हान निर्माण होते. भारतीय समाज इतर देशांच्या समाजापेक्षा वेगळा आहे. आपला समाज संबंधांवर आधारीत आहे. आम्ही प्रेमावर जगतो. निवडा बाळगतो. दयाभाव बाळगणाऱ्यांवर आम्ही सहसा अविश्वास दाखवायला तयार होत नाहीत. डॉ. कितीही मोठा असला तरी मरीजाचे ऑपरेशन करण्यापूर्वी भूल तज्ञाकडून भूल देतो. तर राजकारणी जनतेची दिशाभूल केल्याशिवाय राजकारण करू शकत नाही. परंतू आजची जनता सुशिक्षित आहे. खरं काय खोटं काय ते समजू शकते. भाजपावाले म्हणतात की विरोधकांच्या खोट्या प्रचारामुळे आमचा पराभव झाला. परंतू आपल्याच लोकांनी केलेली वक्तव्य पहा. १) ९ मार्च २०२४ रोजी कर्नाटकमधील उत्तर कन्नड जिल्हा सिरपूर येथे एका सभेत भाजपचे तत्कालिन खासदार अनंतकुमार हेगडे म्हणाले की, आपल्याला संविधानात बदल करावे लागणार आहेत. संविधानात बदल हवे असतील तर दोन तृतीयांश बहुमताशिवाय पर्याय नाही.



२) ३० मार्च २०२४ राजस्थानच्या नागोर येथे जाहीर सभेत ज्योती मिर्धा संविधानावर बोलताना देशहितासाठी अनेक कठोर निर्णय घ्यावे लागतात. या संविधान बदल करावे लागतात.

३) १४ एप्रिल २०२४ डॉ. बाबासाहेब यांच्या जयंती दिवशी उत्तरप्रदेशच्या अयोध्या फैजाबाद लोकसभा मतदान संघाचे त्या काळचे खासदार आणि भाजपचे लोकसभा उमेदवार लल्लू सिंह जाहीर सभेत म्हटले सरकार तर २७२ सीट मिळाल्यावर तयार होते. मात्र संविधान बदलण्यासाठी २/३ सीटची आवश्यकता असते. म्हणून भाजपाला ४०० जागा हव्या आहेत. ४) १५ एप्रिल २०२४ रोजी उत्तरप्रदेशच्या मेरठ लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार रामायण मालिकेत रामाची भूमिका करणारे अरूण गोविल यांनी संविधानावर मुक्ताफळे उधळताना म्हटले की संविधान तयार केले तेव्हाची परिस्थिती वेगळी होती. कोणताही बदल करणे प्रगतीचे प्रतिक असते. त्यात काहीच चुकीचे नाही. ५) महाराष्ट्रातील भाजप आमदार टी राजा म्हणाले की ४०० पार झालो असतो तर हिंदू राष्ट्र झाले असते. म्हणून भाजपचा हा छुपा डावा होता हे सिद्ध होते. तेव्हा एक नरेटीव्ह तुमच्याच लोकांनी केले मग विरोधकांच्या नावाने बोंब का?

लोकसंसद

## महायुतीला युतीचा प्रचाराचा धडाखा

लोकसभेच्या निवडणुकांत अपेक्षित यश मिळाले नाही. त्या पार्श्वभूमीवर महायुतीने प्रचाराचा धडाखा लावला आहे. १ जुलैपासून १० ऑक्टोबरपर्यंत म्हणजेच गेल्या सुमारे तीन एक महिन्यात तब्बल ७६८० निर्णय काढले आहेत. या योजनेत महिला, वृद्ध, तरुण, बेरोजगार, शेतकरी इत्यादी सर्व वर्गाचा समावेश आहे. मागील तीन महिन्यात तब्बल दीड लाख कोटीच्या योजना जाहीर झाल्या आहेत. तसेच या योजनेच्या प्रचार घरोघरी करण्यासाठी ५० हजार प्रचार दूत नेमले जाणार आहेत. त्यांना मानधन असे प्रत्येकी दहा हजार रुपये दिले जाणार आहेत. महत्वाच्या अशा दहा योजनांचा समावेश या प्रचारात असणार आहे. ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. आज अनेक पेपर्समध्ये दररोज प्रचाराच्या जाहिराती येत आहेत. जाहिराती इतक्या प्रमाणात प्रसिद्ध होत आहेत की त्या वाचावयास कित्येकांना वेळ सुद्धा नाही. एकूणच प्रचार जोरात चालू आहे या प्रचारामुळे महायुती विधानसभा मध्ये निवडणूक जिंकेल का? सर्वात मोठी योजना म्हणजे लाडकी बहीण ही योजना होय. या योजनेमुळे कोट्यावधी महिलांना फायदा झाला आहे. यातील निम्या महिलानी जरी महायुतीला मतदान केले तरीही महायुती सत्तेत येऊ शकते. मध्यप्रदेश राज्यात लोकसभेला या योजनेमार्फत भाजपाला चांगले यश मिळाले होते. महाराष्ट्रात याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे बहुतेक आज आचार संहिता लागेल असते वाटते.

**- शांताराम वाघ पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१७ ऑक्टोबर**

**१८६३ :-** कवी, नाटककार एकनाथ गणेष भांडारे यांचा जन्म. जगन्नाथाच्या 'करुणाविलाप' च्या मराठी भाषांतराने काव्यलेखनाला सुरुवात. त्यांनी केलेल्या इंग्रजी कवितांची भाषांतरे 'मुक्तांजली' या काव्यसंग्रहात प्रसिध्द. 'कामसेन राजाचा वध' हे त्यांचे वेश्यागमनाचे दुष्परिणाम दाखवणारे गद्यपद्यात्मक नाटक प्रसिध्द. **१८७१:-** ऐतिहासिक विषयांवर विविध लेख लिहिणारे लेखक हरी गोविंद लिमये यांचा जन्म. 'मराठेशाहीच्या अंताची मीमांसा','युरोपियन राष्ट्रांतील यादवी' ह्या पुस्तकांसह किंकेडच्या 'अ हिस्टरी ऑफ द मराठा प्युपल' या ग्रंथावरील परिचय गाजले. त्यांचा इतिहास विषयक लेखांचा समावेष 'कै. प्रो. हरिभाऊ लिमये', 'जीवन व वाङ्मय' या पुस्तकात झाला आहे. **१८८० :-** ग्रीक साहित्याचे व तत्त्वज्ञानाचे अभ्यासक गोपाळ विष्णू तुळपुळे यांचा जन्म. त्यांनी ग्रीक तत्त्वज्ञानाचा इतिहास चार खंडांत लिहिला. **१८८२ :-** व्याकरणकार, ग्रंथकार दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचे निधन. 'मराठी भाषेचे व्याकरण' हे त्यांचे मराठी साहित्यातील महत्त्वपूर्ण योगदान. याषिवाय 'मराठी पूर्वपीठिका', 'धर्म विवेचन', 'शिशूबोध' अशी ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर आहे. १८९०:-लेखक, नाटककार, संपादक तसेच राजकारण, समाजकार्य, जाहिरात वितरण, स्वातंत्र्य सेनानी इतकेच नव्हे तर वृत्तपत्रे व रंगभूमी अशा सर्व क्षेत्रात आपल्या कार्याचा झेंडा रोवणारे 'समतानंद' या टोपणनावाने लिखाण करणारे अनंत हरी गद्रे यांचा जन्म. 'निर्भीड' या साप्ताहिकासह 'तिरंगी झेंडा', 'नवी मौज', 'राष्ट्रप्रेममाला' इत्यादींचे संपादन त्यांनी केले. 'संगीत भवानी तलवार', 'मूर्तिमंद सैतान', 'स्वराज्य सुंदरी', 'प्रीतीविवाह' ही नाटके त्यांनी लिहिली. मराठी रंगभूमीवर सामाजिक विषयांवर नाटिका आणण्याची प्रथा त्यांनी सुरु केली. त्यामध्ये 'कुमारी मुलींचे कॉलेज', 'तरुण पिढी', 'प्रेमदेवता', 'पूर्ण स्वातंत्र्य' मिळून नऊ नाटके त्यांनी लिहिली. नाटयगृहाबाहेर हाऊसफुल्ल असा बोर्ड लावण्याची प्रथा त्यांनी सुरु केली. **१९१३:-** कवी दिनकर नानाजी षिंदे यांचे निधन. त्यांच्या सुमारे ३००कविता काव्यरत्नावलीतून प्रसिध्द झाल्या. **१९१४:-** गायिका, संगीताच्या अभ्यासिका डॉ. शोभा अभ्यंकर यांचे निधन. 'मराठी संगीताची वाटचाल' हा त्यांचा पीएच्.डी चा प्रबंध राजहंसतर्फे सखी, भावगीत माझे' या नावाने प्रसिद्ध झाला. **१९२८:-** लेखक चित्तरंजन गजानन घोटीकर यांचा जन्म. हायकोर्टात उच्च पदावर कार्यरत असणाऱ्या चित्तरंजनजींनी कोर्टातील गाजलेले खटले 'न्यायालयीन सत्यकथा' ह्या नावाने 'माणूस' मधून लिहिले. त्याला त्याकाळी मोठी प्रसिद्धी मिळाली. संगीताच्या आवडीतून उस्ताद फय्याद खान यांचे चरित्र त्यांनी साकारले तसेच 'दरवाजा बंद आहे' हे नभोनाटय त्यांच्या नावावर आहे. विविध साप्ताहिक, मालिका यातून विपूल प्रमाणात लेखन केले. **१९३१:-** साहित्यिक डॉ. शरद गोपाळराव कोलारकर यांचा जन्म. ह्यांनी 'प्राचीन विदर्भाचा इतिहास' ह्या पुस्तकातून विदर्भाचा प्राचीन काळ ते २९ व्या शतकाच्या अखेरी पर्यंतचा इतिहास लिहिलाय. याशिवाय 'पाणीपुरी' हा ललित लेखसंग्रह तसेच 'जगावेगळे जीवनरंग', 'रोचक आणि वेधक', 'चिनारच्या ज्वाला' ही पुस्तके प्रसिध्द. **१९३८:-** मराठीसह इंग्रजीतून लेखन करणारे सुहास गणेष टिल्लू यांचा जन्म. 'घेराव' ही कादंबरी त्यांची प्रकाशित झाली आहे. **१९४५:-** लेखिका डॉ. शरदिनी अरुण डहाणूकर यांचा जन्म. 'निसर्ग' हा त्यांच्या संशोधनाचा विषय. ह्यांचा वृक्षांच्या सांगोपांग परिचय करवून देणारा 'वृक्ष-गान' हा ग्रंथ प्रकाषित झाला आहे. **१९९९:-** ख्यातनाम साहित्यिक, विविध भाषांचे जाणकार मंगेष भगवंत पदकी यांचे निधन. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक या साहित्य प्रकारांमध्ये विपुल व दर्जेदार लेखन केले. २०२०:-ईशान्यकडील राज्यातील पर्यटन स्थळांची माहिती आपल्या 'मनोभावे' या ग्रंथातून देणारे लेखक शशिधर भावे यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

# टाटा, बायबाय! मान्सून महाराष्ट्रातून परतला

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**जुलै, सप्टेंबर महिन्यात थैमान घातल्यानंतर आता अखेर यंदाच्या वर्षीचा मोसमी पाऊस महाराष्ट्रातील मुक्काम संपवून पुढच्या प्रवासासाठी निघाला असून जाता-जाता तो काही ठिकाणी बरसत आहे. सध्याच्या घडीला देशातून, प्रामुख्यानं महाराष्ट्रातून नैऋत्य मान्सूननं परतीची वाट धरलेली असतानाच राज्यात पावसासाठी मात्र पूरक वातावरण निर्मिती होताना दिसत आहे. पण, हा मान्सून नाही हेसुद्धा तितकंच खरं.**



हवामान विभागाच्या माहितीनुसार मान्सून पतला असूनही राज्याच्या कोकण पट्ट्यासह मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ज्यामुळं या भागांमध्ये पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मराठवाड्यातही पावसाच्या जोरदार सरींची शक्यता तुरळक भागांमध्ये वर्तवण्यात आली आहे. मोसमी पाऊस देशातून परतला असतानाच आता दक्षिण भारतात ईशान्य मोसमी पाऊस सक्रीय झाला आहे. ज्याचे परिणाम महाराष्ट्रापर्यंत दिसून येत आहेत. यंदाच्या वर्षी एक ते दोन दिवस आधील दाखल झालेल्या पावसानं अपेक्षित काळात माघार घेतली. गुजरातच्या कच्छपासून सुरु झालेला हा प्रवास पुढं हरियाणा, दिल्ली, लेह, लडाख, जम्मू आणि काश्मीर, पंजाब, हिमाचल प्रदेशातून माघारी निघाला होता. मागोमागच पावसानं महाराष्ट्रातून परतीचा प्रवास सुरु केला. एकिकडे महाराष्ट्रातून पावसानं माघार घेतल्यामुळं तापमानात काहीअंशांची वाढ झाली असून, दिवस मावळतीला जाताना मात्र, सोसाट्याचे वारे आणि आकाशात येणाऱ्या छटा वातावरणाचं वेगळं रुप सर्वांपुढे आणत आहेत.

## बीएड बेरोजगारांचे आंदोलन

**सिंधुदुर्ग :** जिल्हा परिषदेसमोर जिल्ह्यातील डी.एड्. बेरोजगार तरुण व तरुणींनी पुकारलेल्या बेमुदत आंदोलनाला सिंधुदुर्ग जिल्हा काँग्रेस अध्यक्ष इर्शाद शेख यांनी भेट देऊन पाठिंबा जाहीर केला. डी.एड्. बेरोजगार संघटनेचे अध्यक्ष फाले यांच्याशी चर्चा करून परिपत्रकात बदल करण्याच्या मागणीसंदर्भात शिक्षण आयुक्तांकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. जोपर्यंत परिपत्रकात आंदोलनकर्त्यांच्या मागणीनुसार बदल होत नाही, तोपर्यंत जिल्ह्यातील भरती प्रक्रिया करू नये, अशी विनंती जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना केली. डी.एड्. बेरोजगार २०१० पासून पदविका घेऊन बेरोजगार राहिल्याने डी.एड्. पदविका ज्येष्ठता निकष लावून नियुक्त्या द्याव्यात. असे न केल्याने त्यांची वयोमर्यादा संपुष्टात येणार आहे. त्याचप्रमाणे शाळा ज्या ग्रामपंचायत हद्दीत आहेत. त्याच हद्दीतील उमेदवारास प्रसंगी परिपत्रकातील उल्लेखात बदल करून संधी द्यावी, अशी आंदोलनकर्त्यांची मागणी आहे.

# नवी मुंबई महापालिकेवर हल्लाबोल




**। चिरनेर । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील खोपटे येथील निलेश म्हात्रे या तरुणाचा खोपटे येथे एन एम टी बसच्या चालकाने बेदरकारपणे बस चालवल्यामुळे धडक लागून मृत्यू झाला होता. अपघात झाल्यानंतर वीस दिवसात कुटुंबाला आर्थिक मदत व कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देऊ, असे आश्वासन एनएमटी प्रशासनाच्या माध्यमातून देण्यात आले होते. मात्र, या घटनेला तब्बल आठ महिने उलटून देखील एनएमटी प्रशासनाने कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही. यामुळे संबंधित तरुणाचे कुटुंब व ग्रामस्थ आक्रमक झाले व त्यांनी आज नवी मुंबई महानगरपालिकेवर मोर्चा काढला.

मृत तरुण हा घरातील कर्ता पुरुष होता. त्यामुळे संबंधित तरुणाच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, यावेळी येत्या आठ दिवसात चर्चा करून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देऊ असे एनएमटीचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, तुषार दौडकर यांनी सांगितले.

२२ फेब्रुवारीला एनएमटी चालकाने बेदरकारपणे बस चालवली व माझ्या भावाचा अपघातात मृत्यू झाला होता. अपघातात मृत्यू झाल्यानंतर २० दिवसात भरपाई व कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देऊ असे आम्हाला आश्वासन दिले होते मात्र तब्बल आठ महिने या गोष्टीला उलटूनही आम्हाला न्याय मिळाला नाही त्यामुळे आम्ही आंदोलन केले, असे विनय म्हात्रे याने म्हंटले आहे.

## शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना

**रायगड :** राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी महत्तम कर्ज मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत, परदेशी अभ्यासक्रमासाठी महत्तम कर्ज मर्यादा २० लाख रुपयांपर्यंत आहे. शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना पूर्णपणे ऑनलाईन असून ज्या उमेदवारांना शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी आपले अर्ज महामंडळाच्या संकेतस्थळावर जावून भरावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक निशिकांत नार्वेकर यांनी केले आहे.

इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता बँकेमार्फत मंजूर केलेल्या २० लाख रुपयेपर्यंत कर्ज रकमेवरील व्याज परतावा महामंडळाकडून वितरीत केला जाईल. लाभार्थी पात्रतेच्या अटी व शर्ती- अर्जदाराचे वय १७ ते ३० वर्षे असावे, अर्जदार हा इतर मागास प्रवर्गातील असणे तसेच तो महाराष्ट्राचा रहीवासी असावा, अर्जदाराची कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण व शहरी भागाकरीता८ लाखांपर्यंत असावी, अर्जदार हा इयत्ता १२ वी ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण असावा तसेच पदवीच्या व्दितीय वर्ष व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी ६० टक्के गुणांसह पदवीका उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, अर्जदाराचा सिबील क्रेडीट स्कोअर किमान ५०० पेक्षा अधिक असावा. कर्ज प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे-अर्जदाराचा इतर मागास प्रवर्गातील जातीचा दाखला, तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला, तहसिलदार यांचा महाराष्ट्र रहिवासी (वय अधिवास) दाखला, अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे आधारकार्ड, फोटो, आदींचा समावेश आहे.

# धम्मक्रांतीमुळे सामाजिक परिवर्तनाला गती

**। चिपळूण । वार्ताहर ।**

बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरच्या ऐतिहासिक दीक्षाभूमीवर केलेली धम्मक्रांती ही जगातील एक अद्भुत क्रांती आहे. या क्रांतीमुळे भारतातील सामाजिक परिवर्तनाला प्रचंड गती मिळाली व मूकनायकांचा आवाज बुलंद झाला, असे प्रतिपादन प्रा. डॉ. ज्ञानोबा कदम यांनी येथे केले. चिपळूण तालुका बौद्धजन हितसंरक्षक समिती चिपळूण स्थानिक व मुंबई यांच्यावतीने संस्थेच्या चिपळूण येथील विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक भवनात ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन झाला. डॉ. बाबासाहेबांनी धर्मांतर का केले? या धर्मांतरचे महत्व काय आहे, हे नव्या पिढीने समजून घेण्याची गरज आहे. ६०-७० वर्षांपूर्वीचा काळ किती भयानक होता याची जाणीव नव्या पिढीला करून दिल्यावरच डॉ. बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीचे महत्व आपल्या लक्षात येईल. बुद्धांच्या काळापासून ते आधुनिक काळापर्यंत बुद्ध धम्माची कशा पद्धतीने वाटचाल राहिली, बुद्ध धम्माला राजाश्रय कसा मिळाला. याबाबत प्रा. कदम यांनी माहिती दिली. संस्थेचे स्थानिक अध्यक्ष चंद्रकांत सावंत यांनी डॉ. बाबासाहेबांच्या शिक्षणविचारांचा मागोवा घेतला. या वेळी धम्म ध्वजारोहण धम्म कमिटीचे अध्यक्ष मनोहर कदम, माजी गटविकास अधिकारी अरूण जाधव, उपाध्यक्ष नाना सावंत, बुद्धभूषण गमरे, सरचिटणीस संदेश पवार, सहचिटणीस तुकाराम सकपाळ, प्रमोद कांबळे आदी उपस्थित होते. विद्यार्थिनी दिक्षा मोहिते हिने मुंबई विद्यापीठांतर्गत घेण्यात आलेल्या कथालेखन स्पर्धेत द्वितीय स्थान पटकावून रौप्य पदक मिळवले. त्याबद्दल तिचा संस्थेच्यावतीने विशेष सत्कार करण्यात आला.

## माजी सैनिकांनी अर्ज करावेत

**रायगड :** माजी सैनिकांमधून सुरक्षा रक्षक, सैनिकी प्रशिक्षक, रेक्टर्स, विविध खेळाचे प्रशिक्षक व लिपीक इ.पदांवर माजी सैनिकांच्या नियुक्या करावयाच्या आहे. याकरिता रायगड जिल्ह्यामधील इच्छूक माजी सैनिक उमेदवारांनी संकेतस्थळावर ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत) यांनी केले आहे. शिक्षण दहावी पास अथवा सैन्यदलाकडून समकक्ष प्रमाणपत्र असावे.

# वीरगळ स्मारकाचा लोकार्पण सोहळा संपन्न

**। माणगाव । वार्ताहर ।**

महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांवर संवर्धन करण्यासाठी कार्यरत असलेल्या दुर्गवीर प्रतिष्ठान मुंबई या संस्थेने उभारलेल्या रातवड येथील तालुक्यातील पहिल्याच वीरगळ स्मारकाचा लोकार्पण सोहळा माजी सैनिक गोपीचंद उतेकर यांच्या हस्ते आणि इतिहास अभ्यासक सुखद राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

प्राचीन कालखंडातील वीरांच्या दुर्मिळ प्रकारातील वीरगळ जतन करण्याच्या हेतूने दुर्गवीर प्रतिष्ठान संस्थेने रातवडची ग्रामदेवता रातुआईच्या मंदिराशेजारी आणि मुंबई-गोवा महामार्गालगत हे भव्य स्मारक उभारले आहे. यात पाच वीरगळांचा समूह असून त्यांना रासायनिक प्रक्रियेतून संवर्धन केले आहे. दुर्गवीर प्रतिष्ठान संस्थेने स्वखर्चाने वीरगळ स्मारक बांधले असून रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील शिवभक्त आणि वीरगळ संशोधकांसाठी आकर्षण ठरणार आहे. लोकार्पण सोहळ्याप्रसंगी इतिहास अभ्यासक सुखद राणे यांनी उपस्थितांना आपला अलौकिक वारसा जतन करण्यासाठी आवाहन केले. दुर्गवीर प्रतिष्ठानचे रायगड जिल्हाप्रमुख रामजी कदम यांनी वीरगळांबद्दल सविस्तर माहिती आणि स्मारकाचे प्रयोजन मनोगतातून व्यक्त केले. तसेच दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष हसुरकर यांनी संस्थेच्या गडसंवर्धन कार्याबद्दल माहिती सांगितली. वीरगळ स्मारक लोकार्पण सोहळ्याप्रसंगी रातवड उपसरपंच सतीश पवार, निवृत्त पोलिस अधिकारी सुदेश पालकर, रातुआई मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विलास पालकर, माजी उपसरपंच शरद पालकर, ग्रामपंचायत सदस्या सीमा आईत दुर्गवीर प्रतिष्ठानचे सचिव सागर टक्के, उपाध्यक्ष रविंद्र रावराणे, महेशस्वामी जंगम, आम्ही सह्याद्रीचे शिलेदार संस्थेचे अध्यक्ष प्रफुल्ल करकरे तसेच रातवड ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने महिला वर्ग उपस्थित होते.

# निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आंदोलन नको

**■ जिल्हाधिकाऱ्यांनी घातले निर्बंध**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संपूर्ण रायगड जिल्ह्यात सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध घालण्यात आले असल्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केले आहेत.



भारत निवडणूक आयोगाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषीत केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. रायगड जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदार संघातील निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे, आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निबंध घालणे आवश्यक होते.

# मराठी भाषेला अभिजात दर्जा; वाचन संस्कृती वाढेल

## स्मीता खेडेकर यांना विश्वास

**। आगरदांडा । वार्ताहर ।**

मराठी भाषा ही सर्वाथाने समृद्ध अशी भाषा असुन मनाला प्रबुद्ध तथा ज्ञानाची कक्षा वृध्दिंगत होण्यासाठी उपयुक्त आहे. अलिकडे केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याने तंत्रज्ञानाच्या मायाजालात कमी होऊ पाहत असलेली वाचन संस्कृती निश्चितपणे वाढेल, असा विश्वास निवृत्त मुख्याध्यापिका स्मीता खेडेकर यांनी व्यक्त केला.



हिंदु एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्यामंदीर मुरूड येथे आयोजित कार्यक्रमात त्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. मायबोली मराठीमध्ये शिकताना मुलांचे व्यक्तिमत्त्व कुंठीत न राहता मातृभाषेत धडे गिरवताना मानसिक, भावनिक अनुभव कळत नकळत समृद्ध होते. वाचाल तर वाचाल, हे विद्यार्थ्यांनी पक्के स्मरणात ठेवावे, असा मौलिक सल्ला ही त्यांनी दिला. यावेळी योग भगत, समिक्षा हुरदुके, श्रीया गुरव, आरोही सुभेदार, ओजस उपाध्ये, हर्षला घाग, सानवी बेडेकर, सानवी रांजणकर, सही कोतवाल, श्रेया कोलवणकर, ग्रीषा जाधव, अक्षयती घालटे, वेदांगी पेंडसे, निधी कोलवणकर, श्रीया दिवेकर या विद्यार्थ्यांनी कविता वाचन करून दाद मिळविली. विश्वस्त दिपाली जोशी यांच्या अध्यक्षते खाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका प्रविता गार्डी यांनी ओंकार विद्या मंदीरात संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आवर्जुन घेतले जातात असे सांगितले. स्वागत काव्या जोशी यांनी केले.

# थकबाकीदार लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाच्या थकीत कर्ज रक्कम असलेल्या रायगड जिल्ह्यातील लाभार्थीसाठी ओबीसी महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण थकीत कर्ज रकमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थीस थकीत व्याज रकमेत ५० टक्के सवलत देण्याबाबतची एकरकमी परतावा योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. त्यानुसार महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थीनी या योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक निशिकांत नार्वेकर यांनी केले आहे. विविध कर्ज योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील इतर मागास (ओबीसी) प्रवर्गातील लाभार्थींना स्वयंरोजगाराकरीता अल्पव्याजदराने कर्ज वितरीत करण्यात आलेले आहे.

# आदिवासी तरुणांनी स्पर्धा परीक्षांची तयारी करावी

**। खरोशी । वार्ताहर ।**

आदिवासी तरुणांनी पोलीस भरतीसह स्पर्धा परीक्षांची तयारी करावी, असे आवाहन पेण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी केले आहे. यासाठी अभ्यासिका सुरू केल्यास वेळोवेळी मार्गदर्शनासाठी वेळ देणार असल्याचेही यावेळी बागुल यांनी सांगितले.



**पोलीस निरीक्षक संदीप बागुल**

१४ ऑक्टोबर रोजी ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्यावतीने पेण तालुक्यातील तांबडी आदिवासी वाडी येथे तरुणांसाठी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्राम संवर्धन सामाजिक संस्थचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना आदिवासी समाजामध्ये पोलिसांबद्दल असलेली भीती कमी कशी करता येईल तसेच बालविवाहामुळे होणारे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले.यावेळी सहायक पोलीस निरीक्षक राजपूत गोपनीय विभाग नरेश ठाकूर, यांच्यासह नगरिक उपस्थित होते.

# आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूका २०२४ निपक्ष आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व शासकीय यंत्रणेने आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अतिशय सूक्ष्म नियोजन करावे. एकूणच निवडणूक प्रक्रिया सुरळीत होईल याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विधानसभा निवडणूक आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे सर्व समन्वयक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, निवडणूक आदर्श आचारसंहिता लागू झाल्यावर शासकीय इमारत परिसरातील जाहीरात फलक काढावेत आणि आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी भरारी पथकांची नियुक्ती करावी, सीव्हीजील ॲपवर येणाऱ्या तक्रारींच्या निवारणासाठी यंत्रणा कार्यान्वित करावी, निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना त्याची माहिती देण्यात यावी, मुद्रणालयांच्या प्रतिनिधींची बैठक घेवून नियमातील तरतूदींची माहिती द्यावी, असेही स्पष्ट केले.

जिल्हास्तरावर आणि निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावरील नियंत्रण कक्ष सुरू ठेवावेत. आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्याबाबत बँक अधिकाऱ्यांची बैठक घेवून अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात. स्ट्राँगरुमची व्यवस्था चोख करावी. सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निवडणूक विषयक प्रशिक्षण त्वरीत घेण्यात यावे. विविध परवानग्या देण्यासाठी ऑनलाईन व्यवस्था करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

निवडणूकीची घोषणा झाल्यानंतर शासकीय मालकीची कार्यालये, शासकीय इमारती आणि त्यांच्या संरक्षक भिंतीवरील जाहिराती, भित्तीपत्रके, कापडी फलक, कटआऊट, जाहिरात फलकावरील संदेश, झेंडे इत्यादी तात्काळ काढावीत. सार्वजनिक जागेवरील सर्व राजकीय जाहिराती, भित्तीपत्रके देखील काढावेत. बसस्थानक, बसथांबा, रेल्वे पुल, एसटी महामंडळाच्या बसेस व विद्युत व टेलिफोन खांब, यावरील जाहिराती काढणे बंधनकारक आहे. याबाबत संबंधित यंत्रणेने तातडीने कार्यवाही करावी. तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे, असे आदेश त्यांनी दिले.

## प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलकांची माघार

# तिलारीवासीयांनी एसटी वाहतूक रोखून धरली

**। सिंधुदुर्ग । वार्ताहर ।**

**तिलारी घाटमार्गे वाहतुकीस प्रतिबंध घातलेल्या एसटी बसची सेवा सुरू करावी, अशी मागणी करून देखील कोल्हापूर प्रशासन कानाडोळा करीत असल्याने स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी तिलारी कोदाळी येथे रास्ता रोको आंदोलन छेडले. आक्रमक पवित्रा घेतलेल्या आंदोलकांनी प्रांताधिकारी यांच्या आश्वासनाअंती आंदोलन मागे घेतले. येत्या दोन दिवसात योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी सकारात्मकता गडहिंग्लज प्रांताधिकारी एकनाथ कलबांडे यांनी दर्शविली. कोल्हापूर जिल्हाधिकारी यांनी पावसाळ्यात उद्भवलेल्या अतिवृष्टीमुळे तिलारी घाटमार्गे अवजड वाहनांची वाहतूक बंदी केली.**

त्यामुळे एसटी बसला देखील या मार्गाने वाहतूक करण्यावर प्रतिबंध पडला. तेव्हापासून या मार्गाने धावणारी बस सेवा बंद आहे. गेल्या चार महिन्यांपासून बंद असलेल्या एसटी बसमुळे स्थानिकांचे हाल झाले. शाळा, कॉलेजचे विद्यार्थी, वृध्द व कामानिमित्त प्रवास करणाऱ्यांची ससेहोलपट झाली. त्यामुळे स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी व ग्रामस्थांनी एकत्र येऊन तिलारी घाटातून बस सेवा सुरु करण्याचे निवेदन कोल्हापूर जिल्हाधिकारी यांना दिले होते. परंतु, त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. म्हणून येथील स्थानिकांनी कोल्हापूर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमोर उपोषण छेडले होते. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी प्रांत व संबंधित कार्यालयाचे अधिकारी यांना घाट रस्त्याची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार गडहिंग्लज प्रांताधिकारी एकनाथ कलबांडेसोबत सार्वजनिक



बांधकाम विभाग अधिकारी, एसटी महामंडळाचे अधिकारी, आरटिओ विभागाचे अधिकारी यांनी आठ दिवसांपुर्वी प्रात्यक्षिक घेतले होते. मात्र, एसटी बस चालु करण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही झाली नाही. प्रशासनाच्या या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत स्थानिकांनी आक्रमक पवित्रा घेतला. तिलारी घाटाच्या माथ्यावर कोदाळी येथे स्थानिकांनी रास्ता रोको आंदोलन छेडले. या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी चंदगड पोलिसांचा बंदोबस्त तैनात होता. मात्र, महसूल प्रशासन अधिकारी उपस्थित नसल्याने आंदोलनकर्ते आपल्या भुमिकेवर ठाम राहिले. शेवटी प्रांताधिकारी कार्यालयातून प्रतिनिधी उपस्थित राहिला. आंदोलनकर्त्यांची समजुत काढत प्रांताधिकारी निवडणूकीच्या कामात व्यस्त आहेत. त्यांनी आपल्या कार्यालयात भेटण्याची विनंत केली. त्या विनंतीला मान देऊन आंदोलनकर्त्यांचे प्रतिनिधींनी गडहिंग्लज येथील कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान येत्या दोन दिवसात फेर अहवाल करून जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणार आहे. त्यामुळे तुर्तास रास्ता रोको आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. त्यांनी एसटी बस चालू करण्यासाठी दर्शविलेली सकारात्मकतेमुळे रास्ता रोको आंदोलन तुर्तास मागे घेण्यात आल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. तसेच पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.

निवडक

## भजनाच्या बारीचे आयोजन

**नेरळ :** कर्जत शहरातील श्री धापया मंदिर देवस्थानच्यावतीने वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी धापया मंदिरात भजनाच्या बारीचे आयोजन करण्यात आले होते. भजन भूषण गजानन पाटील यांचे शिष्य असलेले सुनील देशमुख यांनी गायिलेल्या भजनाने मोठा प्रतिसाद भजनी रसिकांनी दिला. यावेळी सुनील देशमुख यांनी ओंकार म्हात्रे यांच्या तबला वाद्याच्या साथीने 'उदो उदो ग बोला, अंबाबाई माऊलीचा उदो ग' या गायलेल्या भजनाने सर्व कर्जतकर मंत्रमुग्ध झाले होते.

## सुतारवाडीत मुसळधार पाऊस

**सुतारवाडी :** गेल्या दोन दिवसांपासून विजांच्या लखलखाटासह जोरदारपणे कोसळणाऱ्या पावसामुळे येथील जनजीवन विस्कळीत झाले असून भात शेतीला मोठा धोका निर्माण झाला आहे. कापणीला आलेली पिकं सतत पडणाऱ्या पावसामुळे खराब होतील की काय, अशी भीती बळीराजाला आहे. दररोज दुपारनंतर अचानकपणे विजांच्या लखलखाटासह कोसळणाऱ्या पावसामुळे भात शेतीला धोका निर्माण झाला असून बळीराजाची चिंता वाढली आहे.

## पायगुडे यांचा सन्मान

**तळा :** महिलांच्या योगदानाची दखल घेण्यासाठी महाराष्ट्र शासन कृषी विभागाकडून यशस्वी महिला उद्योजिका व कुशल महिला शेतकरीचर सन्मान करण्यात येतो. यावेळी राष्ट्रीय महिला किसान दिनाचे औचित्य साधून यशस्वी महिला उद्योजिका व कुशल महिला शेतकरी म्हणून गिरणे ग्रामपंचायत माजी सरपंच आणि उद्योजिका ज्योती कैलास पायगुडे यांचा सन्मान कृषी अधिकारी आनंद कांबळे यांच्या हस्ते करण्यात आला. तळा येथील कृषी कार्यलयात हा सन्मान सोहळा पार पडला.

## विकरा कामांचे भूमिपूजन

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायत हद्दीमध्ये डिकसळ येथे पंचायत समिती सेस फंडातून अंतर्गत गटाराचे काम मंजूर झाले आहे. या गटार बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन माजी नगरसेवक राहुल डाळिंबकर यांचे हस्ते झाले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य भारती पाटील, अमर जाधव, अरविंद मोरे, समीर साळोखे, अमर साळोखे, भगवान गायकवाड, रमेश गायकवाड, हिराताई हिरे, ॲड. उत्तम गायकवाड, किशोर गायकवाड, विजय पाटील, निखिल गायकवाड, विनायक पाटील आदी उपस्थित होते.

## करिअर कट्टा आर्थिक साक्षरता

**उरण :** वाणिज्य व कला महाविद्याल उरणमध्ये करिअर कट्टा अंतर्गत तसेच सेबी यांच्या माध्यमातून आर्थिक साक्षरता या कार्यक्रमांतर्गत शेअर मार्केट कार्यशाळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील एकूण ७८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यापैकी ५४ विद्यार्थ्यांना या कार्यक्रम यशस्वीरित्या ऑनलाईन पूर्ण करण्यामध्ये यश आले आहे. विद्यार्थ्यांना बचत आणि गुंतवणूक कशी करावी आदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# कुंडलिका नदीपात्रात घनकचरा

## नागरिकांवर दुषित पाणी पिण्याची वेळ

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यात नामवंत असलेली तसेच बारमाही वाहणाऱ्या कुंडलिका नदीपात्रात मोठ्या प्रमाणत घनकचरा टाकण्यात येत आहे. कुंडलीका नदीपात्रात घनकचरा टाकल्यामुळे असंख्य नागरीकांना दूषित पाणी पिण्याची वेळ आली आहे. यावर कोण कारवाही करणार, असे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

रोहा तालुक्यातील कुंडलीका नदीच्या तीरावर कोलाड पासून रोह्यापर्यंत अनेक गावे वसलेली आहेत. तसेच, रोहे शहरासह असंख्य गावांना याच नदीतून पाणी पुरवठा करण्यात येतो. यासोबतच लाखो नागरिकांची तहान भागवणाऱ्या कुंडलिका नदीवर अनेक जणांचे उदरनिर्वाह सुरू असून भातशेती बरोबरच विविध प्रकारचे जोड व्यवसाय व उद्योग चालत असतात. परंतु, कोलाड ते पाले बुद्रुक दरम्यानच्या या नदीपात्रात वाहत असलेला वेगवेगळा घनकचरा यात प्लास्टिक पिशव्यांचा वापर करून त्यात अनेक व्यावसायिक, भाजीवाले, फळ विक्रेते, चिकन व मटण दुकानदार या सर्वांचा जो काही घनकचरा आहे तो सर्रासपणे फेकला जातो. यामुळे कुंडलीका नदीच्या पाण्याचे



मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होत आहे. आणि हेच दुषीत पाणी येथील नागरिकांना प्यावे लागत असल्याने सर्वत्र बोंब सुरू आहे.

या दूषित पाण्यामुळे अनेक नागरिकांना गंभीर त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचे गांभीर्य संबधीत अधिकारी प्रशासक यांनी घेतले पाहिजे, अशी मागणी सर्वसामान्यांकडून केली जात आहे.

> कोलाड आणि रोहा परीसरात गणपती उत्सव काळात नदीचे पाणी दूषित होऊ नये म्हणुन स्थानिक रेस्क्यु टीमच्या माध्यमातुन सर्वत्र निर्माल्य संकलन करण्याचे काम करण्यात आले. त्यांनी त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली. परंतु, कोलाडमधील अनेक व्यावसायिक, भाजीवाले, फळ विक्रेते, चिकन व मटन दुकाने या सर्वांचा जो काही कचरा आहे तो सर्रासपणे या नदीपात्रामध्ये फेकला जातो. यापासून नदीच्या पाण्याची गुणवत्ता फार दूषित होत चालली आहे. तसेच, जैवविविधतेवर याचा फार मोठा घात होत आहे. या नदीमध्ये अति दुर्मिळ माशांच्या प्रजाती आढळून येतात, त्या फक्त आपल्या कुंडलिका नदी मध्येच आढळतात, अशा जीवांचे अस्तित्व संकटामध्ये आले आहे. तसेच, अनेक गावांना याच नदीपात्रातून पिण्याचे पाणी पुरवले जाते. यामुळे नागरिकांनी घनकचरा नदीपात्रात न टाकता त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे गरजेचे आहे.
> – डॉ. मंगेश सानप, कोलाड

# अटल सेतूवर टोलमाफी का नाही?

## स्थानिक जनतेचा सत्ताधारी नेत्यांना सवाल

**। उरण । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणूका जाहीर होण्याआधी महायुतीकडून मुंबईतील पाच ठिकाणी टोलमाफी केल्याचे जाहीर केले. परंतु, मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या अटल सेतुवरील टोलमाफी केली नाही. या सेतुवरील टोलमाफी का केली नाही, असा संतप्त सवाल महायुतीतील स्थानिक नेत्यांना जनता करीत आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मुंबईमध्ये प्रवेश करताना लागणारे पाच टोलनाके वाशी, दहिसर, ऐरोली, मुलुंड आनंदनगर या ठिकाणी हलक्या वाहनांना टोलमधून वगळले आहे. यामुळे रोज हजारो गाडी चालकांना याचा फायदा होणार आहे, तर कोट्यवधी रुपयांचा फटका राज्य शासनाला बसणार आहे. मुंबईतील टोल माफ केले जात असताना मुंबईच्या हाकेवर असणाऱ्या अटल सेतुवरील टोलमाफीचा निर्णय महायुती सरकारने का घेतला नाही, असा दुजाभाव का केला जात आहे. याबाबत महायुतीतील स्थानिक नेतेमंडळी गप्प असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. त्यांना आमची मतं हवी; परंतु आम्हाला सुविधा देण्यास अडचण दिसत असल्याने स्थानिक जनतेत महायुतीबाबत नाराजीचा सूर निघत आहे.

# उलवे पोलीस ठाण्याचे उद्घाटन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शेवा बंदर विभागातील सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या अख्त्यारीत असलेल्या व काही विभाग एनआरआय पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या उलवा नोड येथील नव्याने साकारण्यात आलेल्या उलवे पोलीस ठाण्याचे उद्घाटन नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते सोमवारी (दि. १४) करण्यात आले. यावेळी अपर पोलीस आयुक्त दिपक साकोरे, सहपोलीस आयुक्त संजय येनपुरे व पनवेल परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते उपस्थित होते.



नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात मागील काही वर्षात नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. एकूण २० पोलिस ठाणी असलेल्या नवी मुंबईत उलवे पोलीस ठाण्याच्या रूपाने एका पोलीस ठाण्याची वाढ झाली असून, आत्ता नवी मुंबईतील पोलीस ठाण्यांची संख्या २१ वर पोहोचली आहे. या पोलीस ठाण्याच्या उद्घाटनप्रसंगी शेवा बंदर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विशाल नेहूल, न्हावाशेवा पालीलस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुम बागवान यांच्यासह न्हावाशेवा बंदर विभागातील पोलीस कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. लवकरच या उलवे पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येणार असल्याची माहिती व.पो.नि. अंजुम बागवान यांनी दिली.

# 'वाचू आनंदे' उपक्रमाचे आयोजन

**। पेण । वार्ताहर ।**

पेण एज्यूकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात मंगळवारी (दि.१५) भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून मराठी विभाग व मराठी वाड्.मय मंडळ, डी. एल. एल.ई.युनीट आणि ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने 'वाचू आनंदे' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. सदानंद धारप, कलाआणि इतिहास विभाग प्रमुख डॉ. यु.ए. खाडिलकर, हिंदी विभाग प्रमुख व डी.एल.एल. ई. युनिटचे समन्वयक डॉ. डी.के. बामणे, जी.जी. जोशी, विजया ठाकूर, सुषमा खोत, राधिका गोंधळी, सुप्रिया धुमाळ आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



# मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला प्रतिसाद

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात हार्मोनी फाऊंडेशन कडून गेली १५ वर्षे नेत्र चिकित्सा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित केली जात असून या संस्थेच्या १३५ व्या शिबिरामध्ये ९४ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली, त्यातील मोतीबिंदू दोष आढळलेल्या २२ रुग्णांना नवीन पनवेल येथे नेण्यात आले. आर झुनझुनवाला आय हॉस्पिटल यांच्या माध्यमातून नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जात आहेत.



नेरळ येथील हार्मोणी फाऊंडेशन आणि आर झुनझुनवाला आय हॉस्पिटल यांच्या माध्यमातून १३५ वे नेत्र चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन हार्मोनी फाऊंडेशनचे नितीन कांदळगावकर, नम्रता कांदळगावकर, हर्षल कुलकर्णी, डॉ मोशिन सय्यद यांचे हस्ते फीत कापून झाले. या शिबिरात रुग्णांची नेत्र तपासणी डॉ मोषिन तसेच आरोग्य पथकाचे विजय बामणे, गुरुनाथ घुटे, प्रवीण गेंद, अवंतिका गलांडे, नंदिनी देवघरकर, विश्वनाथ पाटील यांनी केली. या शिबिरात ९४ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली, त्यातील २२ रुग्णांना नेत्र दोष आढळून आले असून त्यांना तत्काळ नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला रुग्णालयात नेण्यात आले.

या शिबिरात ॲक्यू प्रेशर थेरपिस्ट यांच्या हस्ते रोग निदान करण्यात आले. तेथे थेरपिस्ट मिलिंद पटवर्धन आणि अमित सकपाळ यांनी १६ रुग्णावर उपचार केले. या शिबिराला भारतीय जनता पक्षाचे कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत तसेच दत्ता ठमके. प्रवीण भोईर, सखाराम कडाली यांनी भेट देवून शुभेच्छा दिल्या.

# गृहउद्योग मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन

**। वावोशी । वार्ताहर ।**

महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी होण्यासाठी आपल्या घराच्या परिसरातच गृहउद्योग सुरू करावा, या उद्देशाने वैष्णवी इंटरप्रायजेसच्या मुख्याधिकारी आणि आत्करगावच्या माजी उपसरपंच मालती गायकवाड यांनी खोपोली संगम हॉल येथे महिलांसाठी मोफत गृहउद्योग मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन केले होते.

या मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून आरना गृहउद्योगाच्या प्रमुख समीक्षा जाधव उपस्थित होत्या. समीक्षा जाधव यांनी उपस्थित महिलांना उद्योग संधींची निवड, बाजारपेठ सर्वेक्षण, विपणन व्यवस्था आणि व्यवसाय व्यवस्थापन याबाबत सखोल मार्गदर्शन केले. त्या स्वतः मसाल्याचे पदार्थ, बेकरी उत्पादने, चिक्की, भाजी, कापूर आणि अत्तर यासारख्या गृहउद्योगांच्या माध्यमातून कार्यरत आहेत. त्यांनी यशस्वीपणे उत्पादनांपासून विक्रीपर्यंत सर्व प्रक्रिया हाताळण्याचा अनुभव उपस्थित महिलांशी शेअर केला. समीक्षा जाधव यांनी ग्रामीण महिलांनी आपल्या आवडीचे उत्पादने विक्रीसाठी पुढे आणावीत आणि त्यासाठी आरना गृहउद्योग त्यांच्या पाठीशी राहील, असे आश्वासन दिले. खोपोली आणि खालापूर तालुक्यातील अनेक महिलांनी या मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



# संबोध परीक्षा बक्षीस वितरण



**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

रायगड गणित - विज्ञान अध्यापक मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या गणित संबोध परीक्षेचा बक्षीस वितरण समारंभ नांदगाव येथील श्री. छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुरुड पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी सुनील गवळी होते.

यावेळी मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, गणित अध्यापक मंडळाचे संदेश चोरघे, गणित संबोध परीक्षेच्या मुरुड तालुकाप्रमुख मीनल मोरे, शिक्षिका शुभांगी पंची, सुरेश मोरे, म्हात्रे, दत्तात्रय खुळपे, निशा बिरवाडकर, नियती ठमके आदी मान्यवर तसेच सहभागी शाळांचे विज्ञान-गणित शिक्षक उपस्थित होते.

गट शिक्षण अधिकारी सुनील गवळी यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे महत्त्व पटवून दिले. स्पर्धा परीक्षेत यश मिळण्यासाठी सुरुवातीपासूनच गणित संबोध परीक्षेचा सराव असणे खूप आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षेतयशस्वी होण्यासाठी स्वतःला मोबाईल पासून दूर ठेवणे आवश्यक आहे. लवकरच गणित विज्ञानाचे महामंडळ स्थापन करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# परळी अंगणवाडीत शिबिराचे आयोजन

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

अंगणवाडी बालकांसाठी मंगळवारी (दि.१५) परळी येथील अंगणवाडीत शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा २६ बालकांना लाभ झाला. यावेळी बालकांची ऊंची, वजन करून त्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली व त्यांची काळजी घेणेबाबत डॉक्टरांनी उपस्थित मातांना मार्गदर्शन केले. तसेच, त्यांना औषधे, पौष्टिक आहार व नाचणी सत्वाचे वाटप करण्यात आले.

यावेळी मुलांची अद्यायवत माहिती पुरविल्याने कळंब येथील अंगणवाडी सेविका शोभा चंद्रकांत आखाडे यांचे संस्थेच्या लोकांनी कौतुक केले. या



### ■ बालकांची मोफत आरोग्य तपासणी

कार्यक्रमाला डॉ. वसंत काणे, अध्यक्ष कोकण पदवीधर संस्था डॉ. दीपा वैद्य, राजेश बामणे, दत्तात्रय दळवी तसेच अंगणवाडी कर्मचारी उपस्थित होते. एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अधिकारी रंजना म्हात्रे यांनी या शिबिराचे नियोजन करण्यात विशेष परिश्रम घेतले.


## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागाव येथे कामासाठी बाई ची आवश्यकता. घरकाम व मुलाला सांभाळणे. पगार- १२,०००/- संपर्क- ७८७५८६६५५५
- Freshers पाहिजेत : रायगड जिल्ह्यातील अनअनुभवी / नवोदित पुरुष शिक्षकांना अलिबाग येथे पूर्ण वेळ नोकरीची संधी. पात्रता : BA / MA B.Ed, BSc / MSc B.Ed, B.E. / B.Tech पगार : रु. २०,०००/- पर्यंत. अर्ज करा- honestefforts1012@gmail.com
- अलिबाग रेवस रोड येथे चायनीज/हॉटेल त्वरीत स्वरूपात चालवायला देणे आहे. ७५०७३०१३५१, ९२७०४९८०९९.
- फ्लॅट शोधत आहात? नवीन 2BHK प्रशस्त फ्लॅट विकणे आहे. ठिकाण : मोक्याच्या जागी, अलिबाग. अपेक्षित किंमत ८१ लाख, निगोशिएबल, संपर्क :- ८२७५११९८८३.
- अलिबागमध्ये आर्किटेक्चरल फर्मकरीता फ्रेश इंटेरियर डिझाईन कोर्स केलेले ड्रॉप्समन पाहिजेत. संपर्क :- ९४२२०९४१५१.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## आनंद पवार यांची मुक्या जनावरांसाठी माणुसकी

# माथेरानमध्ये घोड्यांसाठी पाणपोई

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या पर्यटनस्थळी वाहनांना बंदी आहे, यामुळे पर्यटकांच्या सोयीसाठी घोडे वाहतुकीचे साधन बनले आहे. गेली १५० वर्षे माथेरानमध्ये घोडे हेच वाहतुकीचे साधन आहेत. या घोड्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करताना अश्वपालकांना अडचणी येत असतात. यावेळी प्राणीप्रेमी असलेले आनंद पवार यांनी माथेरानमधील घोड्यांसाठी पाणपोई सुरु केली आहे.




माथेरानमध्ये ४५० घोडे असून, ते घोडे पर्यटकांना सेवा देत असतात. पर्यटन हंगामात अनेकदा हे घोडे दिवसभर पर्यटकांना सेवा देत असताना त्यावेळी त्यांना तबेल्यापर्यंत जातादेखील येत नाही. परिणामी, घोड्याला लागणारे पिण्याचे पाणीदेखील जंगलात शोधून देण्याची वेळ अश्वपालकांवर येत असते. हे लक्षात घेऊन या मुक्या प्राण्यांसाठी माथेरान शहरात नेहमी पर्यटनासाठी येणारे पर्यटक आनंद पवार यांनी घोड्यांसाठी पाणपोई उभारण्याचा प्रस्ताव अश्वपाल संघटना यांच्यापुढे ठेवला होता. यांनतर अश्वपाल संघटनेकडून माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेची परवानगी घेऊन पाणपोई बनवली. यासाठी आवश्यक असलेली १० हजार लीटर क्षमतेची पाण्याची टाकी आणि अन्य साहित्य पवार यांनी उपलब्ध करून दिले आहे.

या पाणपोईचे लोकार्पण आनंद पवार, माथेरान अश्वपाल संघटनेच्या अध्यक्षा आशा कदम, माथेरान पालिकेचे लेखापाल अंकुश इचके, कार्यालयीन प्रमुख सदानंद इंगळे, नगररचनाकार बांगारे, विश्वास पाटील, अश्वपाल इरफान शेख, सचिन पाटील, बंटी कदम, माथेरान नागरी पतसंस्थेचे तज्ज्ञ संचालक गिरीश पवार आदी उपस्थित होते.

# आचारसंहिता पथक ॲक्शन मोडवर

। आगरदांडा । वार्ताहर ।

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून १९२-अलिबाग विधानसभा मतदारसंघ आचारसंहितेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुरुड ग्रामीणचे आचारसंहिता पथक प्रमुख राजेंद्रकुमार खताळ व त्यांच्या सहकार्यासह मुरुड तालुक्यातील विविध भागातील ग्रामपंचायतीमध्ये जाऊन रस्त्यावरील राजकीय पक्षांचे असो या शासकीय जाहिरातीचे बॅनर काढण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती-वरकस मिळकती खरेदी घेण्याची बोलणी पुष्पलता महादेव थळे यांचेबरोबर सुरू केली आहेत. वर मिळकतीवरील मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन व हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ८७४ | ०-३६-७० | ३.२५ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :-१६/१०/२०२४

**ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड.

## PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the Public at large that the Owners namely **1)- Mrs. Jyotsna N. Pamkar, 2)- Mr. Nitin Prabhakar Pamkar,** have agreed to Sell/transfer/assign their **Residential Flat Premises and Equity Shares** as described below, to the intending purchaser;

**Schedule of Property being Residential Flat Premises**

**Flat No. B/1102** admeasuring area about **52.807 Square Meters Carpet** Area (exclusive of Flower bed/Balcony Area) on the 11th floor of the building known as **"Elite Heights"** standing on the plot of land bearing **plot nos. 176+178 and Plot No.191** jointly admeasuring area about **1699.89 Square Meters,** being lying and situated at **Sector-10, Kopra, Kharghar, Navi Mumbai District-Raigad-410210,** along with an **Open Car parking** in the building and **10 (Ten) Fully paid up shares of Rs.50/-** Each numbering from **251 to 260 (both inclusive)** having **share certificate no. 26** and **Members registration No.26** of the Society namely **ELITE HEIGHTS COOPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED.**

If anybody is having any objection, claim, interest, dispute regarding the scheduled premises or any part thereof by way of Sale, Exchange, Mortgage, Charge, Gift Maintenance, inheritance, possession, lease, tenancy, sub-tenancy, lien, license, hypothecation, transfer of title, or beneficial, interest under any trust, right of prescription, or pre-emption, under any agreement or other disposition or under any decree, order of award or otherwise claiming howsoever, are hereby requested to contact the undersigned with the documentary proof substantiating his/her/their objections / claims /details of dispute/s, within Ten (10) days from the date of this publication,

failing which, the Owners will proceed to complete the sale transaction with the intending Purchaser as if there are no third party claims / objections /disputes in respect of the Scheduled Property and there after any claims/objections/disputes, if any, will not be entertained and deemed to be waived off.

**M/S V R LEGAL & Co.**
**Office No-225, Thapar Complex,**
**Plot No. 51, Sec-15, CBD Belapur,**
**Navi Mumbai-400614**
**Contact- +91-7777077899,**
**Email id: adv.vrlegal@gmail.com**

## जाहीर नोटिस

**कर्जत येथील मा. सह दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ट स्तर यांचे न्यायालयात**

वकीलांचे नाव - ॲड. प्रमोद सुर्वे

रे.मु.क्र.४/२०२२ नि.नं. ने.ता.२२/११/२०२४
नि.नं. ५९/ड

श्रीमती मथुरा शिवाजी राऊत वगैरे - वादी
कुमारी किशोरी शिवाजी राऊत वगैरे - प्रतिवादी

श्रीमती शोभा सुरेश शेळके वगैरे यांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, श्रीमती मथुरा शिवाजी राऊत रा. गारपोरली, ता. कर्जत, जि. रायगड व सौ. वैशाली शिवाजी राऊत उर्फ वैशाली नरेश लोंगले रा. उमरोली, ता. कर्जत, जि. रायगड (मयत वारस) वादी यांनी तुमच्या विरूध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी त्या वादा संबंधी तुम्हाला जे काही सांगायचे असेल ते सांगणेसाठी दिनांक २२/११/२०२४ रोजी सकाळी ११ वाजता तुम्ही स्वत: किंवा ज्यांस योग्यरीत्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकिलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा एखाद्या इसमबरोबर असलेल्या वकिलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा आदेश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद किंवा प्रतिदावा ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल ते सर्व दस्तऐवज सादर करावेत.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी तुम्ही उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

आणखी अशी नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पुर्वी बजावणीकरीता तुमचा पत्ता दाखल करण्यास तुम्ही कसुर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक १०/१०/२०२४ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाच्या शिक्क्याने हि जाहिर नोटीस देण्यात येत आहे.

**सही/-**
**कनीष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय कर्जत**

न्यायालयाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय कर्जत**

## महापारेषण — प्रस्तावित योजनांची अधिसूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

विद्युत कायदा २००३ च्या कलम १६४ प्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक ०६/प्र.क्र.३१२/उर्जा/४, दिनांक २४.०८.२००६ (शासकीय राजपत्र पान क्रमांक २८०) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे अति उच्च दाब पारेषण योजनेचे काम महापारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करण्याचे प्रस्तावित करीत आहे. जनतेच्या माहितीकरिता ही अधिसूचना देण्यात येत आहे.

२. खालील योजना त्या भागातील अति उच्च दाब ग्राहकांच्या वाढत्या विजेची गरज पुरविण्यासाठी व नविन ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी आहे.

रायगड जिल्ह्यातील डोलवी, ता. पेण येथे मे. जेएसडब्लयू स्टील लि. डोलवी वर्कस् यांना क्षमता विस्तारासाठी (अस्तित्वात असलेले ६०० मेगावॅट + प्रस्तावित ३०० मेगावॅट = ९०० मेगावॅट) फेज-३ अंतर्गत विद्युत पुरवठा करणेबाबत. मे. जेएसडब्लयू स्टील लि. डोलवी वर्कस् यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या.च्या देखरेखीखाली करावयाची कामे: (१) मे. जेएसडब्लयू स्टील लि. डोलवी वर्कस् परिसरात ४०० / २२० के. व्ही. जीआयएस उपकेंद्र स्थापत्य कामासहीत पुढील प्रमाणे उभारणे – (i) ५०० एम. व्ही.ए., ४००/ २२० के. व्ही. आयसीटी, एचव्ही जीआयएस आणि एलव्ही जीआयएस बेसह – २ नं. (ii) ४०० के. व्ही. जीआयएस वाहिनी बे–२ नं. (iii) २२० के. व्ही. जीआयएस वाहिनी बे–२ नं. (iv) आयसीटीसाठी एबीटी मीटर व्यवस्था करणे. (v) स्काडा प्रणाली. (vi) एफओटीई., पी.एल.सी.सी. इत्यादी.

(२) २२० के. व्ही. वडखळ जीआयएस उपकेंद्रात– (i) २२० के. व्ही. जीआयएस वाहिनी बे– २ नं. (ii) अस्तित्वातील एस. ए. एस. मध्ये प्रस्तावित २२० वाहिनी बे चे एकत्रीकरण – ०२ नं. (३) वाहिनीची कामे– (i) अस्तित्वातील ४०० के. व्ही. नागोठाणे – पडघे वाहिनी क्र. २ च्या मनोरा नं ३ वरुन प्रस्तावित ४०० के.व्ही. डोलवी उपकेंद्रात ओपीजीडब्ल्यु सह बहुपथ मनोऱ्यावरुन लिलो करणे – ३० किमी. (ii) प्रस्तावित ४०० के. व्ही. डोलवी उपकेंद्र व अस्तित्वातील २२० के. व्ही. वडखळ उपकेंद्र २२० के. व्ही. जोडणे. सदर योजनेचा अंदाजे खर्च रु. ५८९७०.२० लाख इतका आहे.

३. परवानेधारक अगर हितसंबंध असलेल्या व्यक्तीने हवे असल्यास, ही सूचना प्रसिध्द केलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या विचाराकरिता पारेषण कंपनीस प्रतिवेदने पाठवावीत, अशी त्यांना अधिसूचना देण्यात येत आहे. याबाबतची अधिक माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प योजना), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ३ रा मजला, प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी–१९, बांद्रा–कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई– ४०००५१ यांचेशी वेळीच संपर्क साधून मिळू शकते.

मुंबई :
दिनांक : ०३.१०.२०२४

**सही /–**
**संचालक (प्रकल्प)(प्रभारी)**
**महापारेषण, मुंबई**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**लक्ष द्या**

**ॲप्रेंटिसेस ॲक्ट 1961/1973 (सुधारित) अंतर्गत प्रशिक्षण घेऊ इच्छिणारे इंजिनियरिंग ग्रॅज्युएट्स/डिप्लोमा धारक/ग्रॅज्युएट्स (विविध स्ट्रीम्स) यांचेसाठी**

**अधिसचूना क्र. – सीओ/एपीपीआर/2024/01**

कोकण रेलवे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे द्वारे ॲप्रेंटिसेस ॲक्ट 1961/1973 (सुधारित) अंतर्गत एक वर्षाच्या ॲप्रेंटिसशिप प्रशिक्षणासाठी ग्रॅज्युएट्स ॲप्रेंटिसेस किंवा टेक्निशियन (डिप्लोमा) ॲप्रेंटिसेस म्हणून नावनोंदणी करण्यासाठी वर्ष 2020, 2021, 2022, 2023 आणि 2024 दरम्यान उत्तीर्ण झालेले जनरल स्ट्रीम मधील ग्रॅज्युएट्स आणि इंजिनियरिंग (सिव्हिल, मॅकेनिकल, इलेक्ट्रीकल किंवा इलेक्ट्रॉनिक्स) मध्ये ग्रॅज्युएशन/डिप्लोमा पात्रता धारक उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्यात केआरसीएल च्या विविध स्टेशन्सवर आणि कामाच्या ठिकाणांवर प्रशिक्षण प्रदान केले जाईल. खालील नमूद क्षेत्रांच्या उमेदवारांनी अर्ज करावे.

| विषय | वैद्यकीय संवर्ग | यूआर | ओबीसी एनसीएल | एस सी | एस टी | ईडब्ल्यूएस | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सिविल इंजीनियरिंग | बी1 | 14 | 8 | 8 | 2 | 2 | 30 |
| इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग | बी1 | 10 | 5 | 5 | 1 | 1 | 20 |
| इलेक्ट्रॉनिक्स इंजीनियरिंग | बी1 | 6 | 2 | 2 | 0 | 1 | 10 |
| मैकेनिकल इंजीनियरिंग | बी1 | 10 | 5 | 5 | 1 | 1 | 20 |
| डिप्लोमा (सिविल) | बी1 | 14 | 8 | 8 | 2 | 2 | 30 |
| डिप्लोमा (इलेक्ट्रिकल) | बी1 | 10 | 5 | 5 | 1 | 1 | 20 |
| डिप्लोमा (इलेक्ट्रॉनिक्स) | बी1 | 6 | 2 | 2 | 0 | 1 | 10 |
| डिप्लोमा (मैकेनिकल) | बी1 | 10 | 5 | 5 | 1 | 1 | 20 |
| जनरल स्ट्रीम ग्रॅज्युएट्स | सी1 | 14 | 8 | 8 | 2 | 2 | 30 |
| **एकूण** | | **94** | **48** | **48** | **10** | **12** | **190** |

यूआर- अनारक्षित, ईडब्ल्यूएस – आर्थिक मागासवर्गीय, एससी – अनुसूचीत जाती, एसटी – अनुसूचीत जमाती, ओबीसी (एनसीएल) – इतर मागासवर्गीय- नॉन क्रीमी लेयर

उमेदवारांनी केआरसीएल मधील प्रशिक्षणासाठी केआरसीएल वेबसाइट - **https://www.konkanrailway.com/** वर Quick Links → Graduate Apprentice/Technician Apprentice अंतर्गत पात्रता निकष आणि अधिसूचनेचे तपशील पहावे आणि **दि. 02.11.2024** रोजी किंवा त्यापूर्वी अर्ज सादर करावे.

**दिनांक: 03.10.2024** **मुख्य कार्मिक अधिकारी**

## दी नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट क्र. ८/सी, सेक्टर - १३, १ ला मजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.) - ४१० २०६. प्रशासकीय कार्यालय : २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई -२१. दूरध्वनी क्र ०२२-२७४५८६२८ ई-मेल पत्ता : recovery@ncbmumbai.com

**रजि.एडी**

संदर्भ क्र. : NCB/HO/REC/१६३/२०२४-२५, Date : १५.१०.२०२४

प्रति,
**श्री. योगेश बाबू शर्मा**
फ्लॅटक्र. ३०१, ग्रीन वूड्स सीएचएस लि., सर्व्हे क्र. २४, हिस्सा क्र. २, डायघर, कल्याण शीळ मार्ग, लँडमार्क कल्याण शीळ मार्ग, जि. ठाणे -४००६१२.

महोदय,

**विषय : सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत सूचना तुमच्या विनंतीवर तुम्हाला**

दि. ११.१०.२०२३ रोजी बँकेद्वारे खाते क्र. एचएसएलएन - १६ (१५ - ४३२ - १६) अंतर्गत गृहकर्ज सुविधा मंजूर करण्यात आली होती व त्यांच्या उलवे शाखेच्या माध्यमातून बँकेच्या नावे संपत्तीअंतर्गत प्रतिभूत हितसंबंधांची निर्मिती करून रु. २५.०० लाख वितरीत करण्यात आले आहे. सदर गृहकर्ज सुविधेचा संबंधित तपशील व तुमच्याद्वारे केलेला प्रतिभूत करार/दस्तावेज हे अनुक्रमे अनुसूची ए व बी मध्ये नमूद आहेत. सदर करार/दस्तावेजांच्या अटीअंतर्गत सदर वित्तीय सहाय्याच्या पुन:प्रदानाकरिता कराराअंतर्गत तुम्ही वित्तीय सहाय्य प्राप्त केले होते.

पुढे सदर वित्तीय सहाय्य प्राप्त करतेवेळेस बँकेच्या नावे प्रतिभूत हक्क दस्तावेज जमा करून/ नोंदणीकृत गहाण प्रतिभूत हितसंबंध निर्मित करून गहाण तयार कण्यात आले होते. सदर गहाणासंदर्भातील दस्तावेजही अनुसूची बी मध्ये नमूद आहेत.

प्रतिभूत संपत्तीचा संबंधित तपशील अनुसूची सी मध्ये नमूद आहे. वरील सदर वित्तीयसहाय्य/ पत सुविधांचे नियोजन अनियमित झाले व भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे वेळोवेळी जारी संपत्ती वर्गीकरणासंदर्भातील निर्देश - **मार्गदर्शक सूचनांनुसार दि. ०८.१०.२०२४** रोजी सदर कर्ज हे निष्क्रीय संपत्ती म्हणून वर्गीकृत कण्यात आले.

सदर वित्तीय सहाय्य हे १) श्रीमती निर्मला योगेश शर्मा यांच्या व्यक्तिगत हमीद्वारेही सुरक्षित आहे. सातत्याने विनंती करूनही तुम्ही सदर देणी/थकबाकीच्या दायित्वाचे पूर्तता करण्यात कसूर केली आहे व दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे सदर कायद्याच्या अनु. १३ (२) अंतर्गत बँक तुम्हाला सूचना जारी करून निर्देश देत आहे की तुम्ही सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत बँकेकडे वरील निर्देशित तुमच्या संपूर्ण दायित्वाचे प्रदान करावे.

बँकेकडे असलेले तुमचे दायित्व दि. ३०.०९.२०२४ रोजीनुसार **रु. २५,४६,६२३.०० (रु. पंचवीस लाख सेहेचाळीस हजार सहाशे तेवीस मात्र** इतके असून तुम्हाला दि. ०१.१०.२०२४ पासून सदर रकमेवरील कंत्राटी दराने पुढील व्याज तसेच प्रासंगिक खर्च, मूल्य, प्रभार आदींचेही प्रदान करावे लागेल.

तुमच्याकडून वरील रक्कम **रु. २५,४६,६२३.०० (रु. पंचवीस लाख सेहेचाळीस हजार सहाशे तेवीस मात्र)** अधिक पुढील व्याज - प्रासंगिक खर्च, मूल्य यांचे प्रदान करण्यात कसूर झाल्यास कायद्याच्या अनु.१३ (२) अंतर्गत बँक अनुच्छेद १३ च्या उप अनुच्छेद ४ अंतर्गत तसेच सदर कायद्याच्या अन्य लागू तरतुदींअंतर्गत सर्व वा कोणत्याही अधिकाराचा बँक वापर करील.

अनुच्छेद १३ च्या उप अनुच्छेद १३ अंतर्गत विहित केल्यानुसार तुम्हाला अशीही सूचना देण्यात येत आहे की बँकेकडून लेखी संमती प्राप्त केल्यानुसार सदर सूचनेच्या अनुसूची सी मध्ये विवरणीत सदर प्रतिभूत संपत्तीची विक्री, भाडेकरार वा अन्य स्वरूपात तुम्ही हस्तांतरण करू शकणार नाही.

सदर सूचना ही आवश्यकता भासल्यास कायद्याच्या कोणत्याही लागू तरतुदींअंतर्गत अशा अन्य वा कायदेशीर कारवाई सुरू करण्याच्या बँकेच्या हक्कांना बाधा न आणता आहे.

धन्यवाद
**(श्रीमती मधुरा ए. राऊळ)**
प्राधिकृत अधिकारी

प्रत रवाना :
१. श्रीमती निर्मला योगेश शर्मा
पत्ता : फ्लॅट क्र. ३०१, ग्रीन वूड्स सीएचएस लि., सर्व्हे क्र. २४, हिस्सा क्र. २, डायघर, कल्याण शीळ मार्ग, लँडमार्क कल्याण शीळ मार्ग, जि. ठाणे -४००६१२.
तुम्हाला निर्देश देण्यात येत आहे की तुम्ही केलेल्या हमीच्या अटीअंतर्गत सूचनेत निर्देशित रकमेचे तुम्ही प्रदान करावे.
**(श्रीमती मधुरा ए. राऊळ)प्राधिकृत अधिकारी**

**अनुसूची ए**

| सुविधेचे नाव | दि. ३०.०९.२०२४ रोजीनुसार थकित रक्कम, |
|---|---|
| गृहकर्ज खाते क्र. १६, दि. ११.१०.२०२३ रोजी मंजूर | व्याजासहित रु.२५,४६,६२३.०० (रु.पंचवीस लाख सेहेचाळीस हजार सहाशे तेवीस मात्र) |

**अनुसूची बी**

(प्रतिभूत दस्तावेजांचा तपशील, सर्व सहाय्यक दस्तावेज, गहाण निर्मितीच्या पुराव्याच्या दस्तावेजांसमवेत).

| अ.क्र. | दस्तावेजाचे नाव | निर्मिती दिनांक | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| | एचएसएलएन -१६(१५-४३२-१६) | | |
| १. | डीमांड प्रॉमिसरी नोट | ०३.११.२०२३ | रु.२५,००,०००.०० |
| २. | कर्ज करार | "-" | "-" |
| ३. | लेटर ऑफ लिएन व सेट ऑफ | "-" | "-" |
| ४. | लेटर ऑफ गॅरन्टी | "-" | "-" |
| ५. | हमीदार-को-ऑब्रिगेटर यांच्याकडून लेटर ऑफ लिएन व लेट ऑफ | "-" "-" | "-" "-" |
| ६. | अनुबंध ०३.११.२०२३ | ०३.११.२०२३ | "-" |
| ७. | फॉर्म नं. ३०ए हमी कर्जे | "-" | |

**अनुसूची सी**

**भाग - १ बँकेकडील प्राथमिक सीक्युरिटीचा तपशील**

संपत्तीचे नाव व त्यांचे विवरण

**मालमत्तेचे नोंदणीकृत गहाण : फ्लॅट क्र. ३०२, ३ रा मजला, गणेश कृपा नावाने ज्ञातइमारतीतील, प्लॉट क्र. ३७, सेक्टर -३, उलवे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, मोजमापित ३५७ चौ.फूट.**

वरील मालमत्तांच्या गहाणाकरिता दस्तावेजांचा तपशील :

ए) श्री. अर्पित दीपक शाह व श्री. योगेश बाबू शर्मा यांच्या दरम्यान नोंदणीकरण क्र. पीव्हीएल १- ५९२३-२०२३ व पावती क्र. ७८४४, दि.२४.०७.२०२३ अंतर्गत केलेला मूळ विक्री करार दि. २१.०७.२०२३.

बी) श्री योगेशबाबू शर्मा व दी नॅशनल को-ऑप. बँक लि. यांच्यादरम्यान नोंदणीकरण क्र. पीव्हीएल २- १९४८२-२०२३ व पावती क्र. २२४१२ दि.०३.११.२०२३ धारक मूळ गहाण करार दि. ०३.११.२०२३.

सी) श्री.अर्पितदीपक शाह यांच्याद्वारे स्वाक्षरीत दि. १६.०९.२०२३ रोजी प्राप्त प्रदानाची रु.३,००,०००.०० (रु.तीन लाख मात्र) ची पावती.

डी) बिल्डर श्री.अर्पित दीपक शाह यांच्याद्वारे वितरीत नाहरकत प्रमाणपत्र दि. १६.०९.२०२३ व धारणाधिकार निश्चिती दि.१०.०१.२०२४.

ई) करारानुसार एकूण मूल्याकरिताच्यारु. २५,००,०००.०० (रु. पंचवीस लाख मात्र) प्रदाकरिताचे मागणी पत्र दि.०९.११.२०२३.

एफ) बिल्डर श्री. अर्पित दीपकशाह यांच्याकडून श्री.योगेश बाबू शर्मा यांना वितरीत बिल्डरकडील ताबा सुपूर्तता प्रमाणपत्र दि.२५.०१.२०२४.

जी) सेरसाई नोंदणीकरण दि. २१.०६.२०२४.



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

## १ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाईन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**

**मौजे - धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| ५० | ३ | ०-७१-००<br>पो.ख. ०-०५-०० | ०-५० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, 'लक्ष्मी सदन', जुने एस. टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

दि. १७/१०/२०२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- मौजे/ गाव- मोरे, ता. मुरुड, जि. रायगड, गट क्रमांक व उपविभाग- ६/२, लागवड योग्य क्षेत्र ०-००-००, पोटखराब क्षेत्र हे. आर. ०-८०-००, एकुण क्षेत्र हे. आर. ०-८०-०० आकार रु. पैसे. ०-००, लागवड- गवतपड हि संपुर्ण मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक विनायक जानू दिवेकर, हरी जानू दिवेकर, अनंता जानू दिवेकर, धर्मा जानू दिवेकर, भारती गणपत पनवेलकर यांचेकडुन आमचे अशिल हर्षदा विकास पावशे यांनी रजिस्टर्ड खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

ही मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत सकृतदर्शनी लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागावून येणाऱ्या हरकती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. अन्वर ए. हुसेन**
बी. ए., एल.एल.बी.
रा. मु. दत्तवाडी, मुरुड एस.टी. डेपो जवळ,
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड,
पिन नं. ४०२४०१.
मो. ९४२३८२२७९०

जावक क्रमांक/१८७३/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, रायगड विभाग, कल्पतरु
इमारत, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, रायगड, रायगड, रायगड,रायगड

**चौकशीची जाहीर नोटीस**

एस.आर.एन. क्रमांक: RGD/१३०९७/१८/२४
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक : ३१०/२४
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक मीराय एज्युकेशनल ट्रस्ट बाबत ।
न्यासाचा पत्ता :- सी/उ मल्हारी गणपत मसणे... शॉप नं ८ सेंट्रल प्लाझा, नेरल ईस्ट कर्जत, रायगड, रायगड, रायगड, रायगड
अर्जदार- ज्योत्स्ना महेश विरळे,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १. | ० | ०.०० |

(अ) जंगम मिळकतः- रोख रु. ०/- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |

(ब) स्थावर मिळकत :- रोख रु. ०/- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ०९-०८-२०२४ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक (प्र)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## MAHATRANSCO — SRM RE-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** Specification.

| | |
|---|---|
| **Tender No. : E-Tender -07/2024-25**<br>**Name of Tender :** Re-Tender for work of trimming of tree branches & disposing off the same outside the premises at Major Stores, Panvel for FY 2024-25.<br>**Tender Fee :- Rs. 500 /- + applicable GST**<br>**RFx No.- 7000033610** | **Online Downloading the RFx :** Dt.16.10.2024, 00:00 Hrs. to 22.10.2024, 23:59 Hrs.<br>**Online Submission of the RFx :** On or Before Dt. 22.10.2024, 23:59 Hrs.<br>**Online Opening of the Techno Commercial RFx :** Dt. 23.10.2024, at 10:00 Hrs. (If possible ).<br>**Online Opening of the Price bid:** Dt. 23.10.2024 at 12:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person: -**The Executive Engineer, Mobile No. 8275215120
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer Major Stores, Panvel**

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-लिलाव सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने मुख्य वाणिज्य प्रबंधक ने खालील वेळापत्रकानुसार आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीवर प्रकाशित केलेल्या व्यावसायिक करारांचा ई-लिलाव जाहीर केला आहे.

**अनु. क्र. 1: कराराचे नाव:** एसएलआर भाड्याने देणे - ट्रेन क्र. 22413. **करार/लॉट्सची संख्या:** 01. **प्रकाशनाची तारीख:** 04/10/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 21/10/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 2: कराराचे नाव:** कोकण रेल्वेवरील गाड्यांमध्ये खानपान नसलेल्या वस्तूंच्या विक्रीचे करार (पेडणे-ठोकुर). **करार/लॉट्सची संख्या:** 01. **प्रकाशनाची तारीख:** 04/10/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 21/10/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 3: कराराचे नाव:** थिविम आणि मडगाव येथे पे अँड यूज टॉयलेट. **करार/लॉट्सची संख्या:** 02. **प्रकाशनाची तारीख:** 04/10/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 22/10/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 4: कराराचे नाव:** ट्रेनमध्ये जाहिरातींचे प्रदर्शन-मडगांव-मंगलौर-मडगांव (10107/10108) मेमू ट्रेन आणि कोकणकन्या एक्सप्रेस (20112-20111), मांडवी एक्सप्रेस (10104-10103). **करार/लॉट्सची संख्या:** 02. **प्रकाशनाची तारीख:** 05/10/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 22/10/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 5: कराराचे नाव:** मडगाव येथे पार्सल स्कॅनर. **करार/लॉट्सची संख्या:** 01. **प्रकाशनाची तारीख:** 05/10/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 23/10/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 6: कराराचे नाव:** विलवडे, वैभववाडी आणि नांदगाव येथील स्थानकांवर जाहिरात फलक, होर्डिंगद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिरात. **करार/लॉट्सची संख्या:** 03. **प्रकाशनाची तारीख:** 05/10/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 23/10/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 7: कराराचे नाव:** चिपळूण, कणकवली, करमाळी, कारवार, बैंदूर येथील स्टेशन परिसरात व्हिडिओ स्क्रीनद्वारे व्यावसायिक प्रसिद्धी. **करार/लॉट्सची संख्या:** 05. **प्रकाशनाची तारीख:** 05/10/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 24/10/2024 सकाळी 11:00 वाजता.

**अनु. क्र. 8: कराराचे नाव:** रोड ओव्हर ब्रिज/रोड अंडर ब्रिज (महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक) जवळ होर्डिंग्जद्वारे जाहिराती. **करार/लॉट्सची संख्या:** 24. **प्रकाशनाची तारीख:** 08/10/2024. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:** 25/10/2024 सकाळी 11:00 वाजता.

**चौकशीसाठी कृपया संपर्क करा: 1)** श्री. प्रवीण डावरे, **Mob.No.** 9004470597, **2)** श्री शैलेश सावंत, **Mob.No.** 9004470596, **3)** श्री मधुकुमार शेट्टी, **Mob.No.** 9004476082. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** या वेबसाइटला भेट द्या.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**

**मौजे - धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| ५१ | ३ | १-०७-००<br>पो.ख. ०-०८-३० | ५-१९ |

वर नमूद मिळकतीपैकी खरेदी देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-८३-९०, पोटखराबा ०-०८-३० हे-आर-पॉ बाबत

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, 'लक्ष्मी सदन', जुने एस. टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**

**मौजे - धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| ५१ | १/ब | ०-६५-३०<br>पो.ख. ०-०४-९० | ०-५० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, 'लक्ष्मी सदन', जुने एस. टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

# सेमी फायनलमध्ये पोचले चार संघ

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयसीसी वूमन्स टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतील साखळी फेरीतील शेवटचा सामना पार पडला आहे. या शेवटच्या सामन्यात इंग्लंड विरुद्ध वेस्ट इंडिज आमनेसामने होते. वेस्ट इंडिजने हा सामना जिंकला आहे.

इंग्लंडने विंडिजला विजयासाठी १४२ धावांचं आव्हान दिलं होतं. विंडिजने हे आव्हान ४ विकेट्स गमावून आणि २ ओव्हर राखून पूर्ण केलं. विंडिजने १८ ओव्हरमध्ये १४२ धावा करत सामना ६ विकेट्सने जिंकला. इंग्लंडचं पराभवासह स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आलं. सेमी फायनलसाठीचे ४ संघ निश्चित झाले आहेत. विंडिज सेमी फायनलमध्ये पोहचणारी चौथी टीम ठरली आहे.




### सेमी फायनलसाठी ४ संघ

ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, साऊथ आफ्रिका आणि वेस्टइंडीज हे चार संघ सेमी फायनलमध्ये पोचले आहेत. या स्पर्धेतील पहिल्या सेमी फायनलमध्ये ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका आमनेसामने असणार आहेत. हा सामना गुरुवारी १७ ऑक्टोबर रोजी दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये होणार आहे. तर शुक्रवारी १८ ऑक्टोबरला दुसऱ्या सेमी फायनलमध्ये विंडिज विरुद्ध न्यूझीलंड भिडणार आहेत. तर रविवारी २० ऑक्टोबरला महाअंतिम सामना पार पडणार आहे.

### १ ट्रॉफी २ ग्रुप आणि ४ टीम

वेस्ट इंडिज बी ग्रुपमधून उपांत्य फेरीत पोहचली आहे. तसेच दक्षिण आफ्रिकेनेही सेमी फायनलमध्ये धडक दिली आहे. बी ग्रुपमधून सेमी फायनलसाठी विंडिज, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडमध्ये चुरस होती. साखळी फेरीनंतर या तिन्ही संघांनी साखळी फेरीत ४ पैकी ३ सामने जिंकले. मात्र नेट रनरेटच्या जोरावर २ संघ निश्चित झाले. मात्र, तुलनेत इंग्लडचं नेट रनरेट उत्तम नसल्याने त्यांना साखळी फेरीनंतर परतीचा प्रवास करावा लागणार आहे. तर ए ग्रुपमधून ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या २ संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला आहे. ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरीत पोहचणारा पहिला संघ ठरला. ऑस्ट्रेलियाने साखळी फेरीतील ४ पैकी ४ सामने जिंकले. तर न्यूझीलंडने १४ ऑक्टोबर रोजी पाकिस्तानचा धुव्वा उडवला आणि सेमी फायनलचं तिकीट मिळवलं. टीम इंडियाने साखळी फेरीतील ४ पैकी २ सामने जिंकले तर २ सामने गमावले होते. त्यामुळे टीम इंडियाला सेमी फायनलमध्ये पोहचण्यासाठी पाकिस्तानचं न्यूझीलंडवर विजय मिळवणं बंधनकारक होतं. मात्र, पाकिस्तानचा पराभव झाला आणि न्यूझीलंड सेमी फायनलमध्ये पोहचली.

# चंडिका हथुरुसिंघे यांचे निलंबन

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशचे मुख्य प्रशिक्षक चंडिका हथुरुसिंघे यांना बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) शिस्तभंगाच्या कारणावरून निलंबित केले आहे. त्यांना ४८ तासांसाठी निलंबित करण्यात आले असून या कालावधीनंतर त्यांना तात्काळ बडतर्फ करण्यात येणार आहे.

बोर्डाने त्यांना कारणे दाखवा नोटीसही बजावली आहे. बोर्डाने चॅम्पियन्सट्रॉफी २०२५ पर्यंत अंतरिम प्रशिक्षक म्हणून फिल सिमन्स यांची नियुक्ती केली आहे. बांगलादेशने भारताकडून कसोटी आणि टी-२० मालिका गमावली त्यानंतर हा निर्णय आला आहे. मायदेशात दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत पाकिस्तानचा पराभव करून बांगलादेश भारत दौऱ्यावर आला होता. भारतात, बांगलादेशला प्रथम कसोटी मालिकेत २-० आणि नंतर टी-२० मालिकेत ३-० ने पराभवाचा सामना करावा लागला.

हथुरुसिंघे यांनी गेल्या वर्षी या पदाची सूत्रे हाती घेतली होती. श्रीलंकेचे माजी अष्टपैलू खेळाडू हथुरुसिंघे यांना गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये बांगलादेशचे प्रशिक्षक बनवण्यात आले होते. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीपर्यंत त्यांचा कार्यकाळ होता. ५६ वर्षीय हथुरुसिंघेच्या नेतृत्वाखाली बांगलादेशने गेल्या वर्षीच्या एकदिवसीय विश्वचषक आणि यंदाच्या टी-२० विश्वचषकात अत्यंत खराब कामगिरी केली होती. बांगलादेशने पाकिस्तानविरुद्ध २-० अशी कसोटी मालिका जिंकणे ही हथुरुसिंघेची या वर्षातील सर्वोत्तम कामगिरी आहे.

# भारत-न्यूझीलंड पहील्या कसोटीचा पहिला दिवसाचा खेळ अखेर रद्द

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत-न्यूझीलंड यांच्यातल्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या दिवसाचे दोन सत्र पावसामुळे वाया गेले आहेत. बांगलादेशविरुद्धच्या मालिकेत २-० असा दणदणीत विजय मिळवल्यानंतर भारतीय संघ घरचं मैदान पुन्हा गाजवण्यासाठी तयार झाला आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटीत टीम इंडियाचा आक्रमक पवित्रा पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. पण, पावसामुळे चाहत्यांच्या उत्साहावर पाणी फिरवले आहे. दोन सत्र वाया गेल्यानंतर कव्हर्स हटवण्यात आले होते. पाऊस आता विश्रांती घेतोय असे चिन्ह दिसत असताना वरुण राजा पुन्हा बरसले. त्यामुळे अखेरीस आजच्या दिवसाचा खेळ थांबवण्याचा निर्णय घेतला गेला. १९५५ ते २०२१ या कालावधीत घरच्या मैदानावर यांच्यात झालेल्या ३६ कसोटीत भारताने १७ जिंकल्या आहेत, तर २ गमावल्या आहेत. १७ कसोटी ड्रॉ राहिल्या आहेत. बीसीसीआयने दिलेल्या माहितीनुसार उद्याचा खेळ लवकर सुरू होणार आहे. सकाळी ८.४५ वाजता नाणेफेक होईल, तर ९.१५ वाजता दुसऱ्या दिवसाचा खेळ सुरू होईल. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेत भारतीय संघ अव्वल स्थानावर आहे.



# दुसऱ्या टी-२० सामन्यात श्रीलंकेचं कमबॅक

## वेस्ट इंडिजचा ७३ धावांनी केला पराभव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

श्रीलंका आणि वेस्ट इंडिज यांच्यात तीन सामन्यांची टी-२० मालिका सुरु आहे. या मालिकेतील दुसरा सामना श्रीलंकेसाठी खूपच महत्त्वाचा होता. मालिकेत बरोबरी साधण्यासाठी दुसरा सामना जिंकणं आवश्यक होतं. श्रीलंकेने दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजच्या संघाला पराभूत केले.

श्रीलंकेने वेस्ट इंडिजला ७३ धावांनी पराभूत केलं आणि मालिकेत १-१ बरोबरी साधली. मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना १७ ऑक्टोबरला होणार आहे.

श्रीलंकेला खेळपट्टीचा चांगला अंदाज होता. त्यामुळे नाणेफेक जिंकल्यावर लगेचच पहिल्यांदा फलंदाजीचा निर्णय घेतला. श्रीलंकेने ७.६७ धावांची धावगती राखत ५ गडी गमवून १६२ धावा केल्या. तसेच विजयासाठी १६३ धावांचं आव्हान दिलं. हे आव्हान पहिल्या टी-२० सामन्याप्रमाणे सहज गाठेल असं वाटत होतं. पण तसं काही झालं नाही. वेस्ट इंडिजचा डाव पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळला. एक फलंदाज मोठी धावसंख्या उभारू शकला नाही. आघाडीचे फलंदाज तर एकेरी धावसंख्येवरच तंबूत परतले. दुनिथ वेल्लालगेने सर्वोत्तम गोलंदाजी केली. त्याने ४ षटकात फक्त ९ धावा देत ३ गडी बाद केले. तर महीश थीक्षाणाने २, चरीथ असलंकाने २, वानिंदू हसरंगाने २ आणि मथीशा पथिरानाने १ गडी बाद केला.

खेळपट्टीचा अंदाज असल्याने श्रीलंकन कर्णधाराने नाणेफेकीवेळीच धावांचा अंदाज वर्तवला होता. या खेळपट्टीवर १६०-१७० इतकी धावसंख्या खूप असेल, असं त्याने तेव्हाच स्पष्ट केलं होतं. झालंही तसंच. श्रीलंकने ठरल्याप्रमाणे २० षटकात ५ गडी गमवून १६२ धावा केल्या आणि विजयासाठी १६३ धावांचं आव्हान दिलं. पण वेस्ट इंडिजचा संघ या धावांचा पाठलाग करताना गडगडला. त्यांनी सर्व गडी बाद फक्त ८९ धावा केल्या.



### दोन्ही संघांची प्लेइंग ११

वेस्ट इंडीज (प्लेइंग इलेव्हन): रोव्हमन पॉवेल (कर्णधार), ब्रँडन किंग, एविन लुईस, आंद्रे फ्लेचर (विकेटकीपर), रोस्टन चेस, शेरफेन रदरफोर्ड, रोमॅरियो शेफर्ड, शमर स्प्रिंगर, अल्झारी जोसेफ, गुडाकेश मोटी, शामर जोसेफ.

श्रीलंका (प्लेइंग इलेव्हन): चरित असलंका (कर्णधार), पाथुम निसांका, कुसल मेंडिस (विकेटकीपर), कुसल परेरा, कामिंदू मेंडिस, भानुका राजपक्षे, वानिंदू हसरंगा, दुनिथ वेललागे, महेश थेक्षाना, मथीशा पाथिराना, नुवान थुशारा.

# ऑस्ट्रेलियाला सतावतेय बुमराची भीती

## कर्णधार पॅट कमिन्सचा माईंड गेम खेळण्याचा प्रयत्न

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये २२ नोव्हेंबरपासून पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेला सुरुवात होणार आहे. या अत्यंत बहुप्रतीक्षित मालिकेचा बिगुल वाजला असून याच पार्श्वभूमीवर ऑस्ट्रेलियन कसोटी संघाचा कर्णधार पॅट कमिन्स याने माईंड गेम खेळण्याचा प्रयत्न केला आहे. त्याने आपल्या सहकाऱ्यांना सल्ला देताना म्हटले की, भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराला गोलंदाजीत यश मिळवून देऊ नका. त्याला शांत ठेवा. त्यानंतरच ऑस्ट्रेलियाला कसोटी मालिका जिंकता येईल.

भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार आहे. भारतीय क्रिकेट संघाने याआधी सलग दोन वेळा ऑस्ट्रेलियामध्ये कसोटी मालिका जिंकण्याचा पराक्रम केला आहे. टीम इंडियाचा संघ यंदा ऑस्ट्रेलियामध्ये कसोटी मालिका विजयाची हॅट्रीक साधण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करताना दिसेले. एका क्रीडा वाहिनीशी संवाद साधताना पॅट कमिन्स या वेळी म्हणाला, मी जसप्रीत बुमराचा मोठा चाहता आहे. तो अव्वल दर्जाचा गोलंदाज आहे. आम्ही त्याला शांत ठेवू याची आशा आहे. त्यामुळे आम्हाला मालिकाही जिंकता येऊ शकेल. भारतीय संघामध्ये बुमरासोबत इतरही गोलंदाज आहेत. जे ऑस्ट्रेलियामध्ये अद्याप खेळलेले नाहीत. आम्ही अजून त्यांना पाहिलेले नाही. पॅट कमिन्सने याप्रसंगी आयसीसी स्पर्धांमध्ये भारताविरुद्ध मिळवलेल्या यशाचा आम्हाला फायदा होईल, असे म्हटले. तो म्हणाला, भारताने आम्हाला आमच्याच देशामध्ये दोन कसोटी मालिकांमध्ये पराभूत केले. मात्र, त्या मालिकांना बराच अवधी झाला आहे. आम्ही भारतावर जागतिक कसोटी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विजय साकारला. तसेच एकदिवसीय विश्वकरंडकाच्या अंतिम सामन्यात त्यांच्यावर मात केली. आमच्यासाठी हे क्षण संस्मरणीय आहेत, असेही तो म्हणाला. भारताविरुद्धची मालिका ही नेहमीच अव्वल दर्जाची ठरत असून, मालिकेला महत्त्व प्राप्त झाले आहे.



# ॲशेस मालिकेचे २०२५-२६ चे वेळापत्रक जाहीर

**। ऑस्ट्रेलिया । वृत्तसंस्था ।**

ॲशेस मालिकेचे २०२५-२६ चे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने बुधवारी वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार या १४२ वर्षे जुन्या मालिकेतील पहिला सामना २१ ते २५ नोव्हेंबर दरम्यान पर्थमध्ये खेळवला जाणार आहे. १९८२-८३ नंतर प्रथमच या मालिकेतील पहिला सामना ब्रिस्बेनऐवजी पर्थमध्ये खेळवला जात आहे. यावेळी इंग्लंडचा संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर आहे.

गेल्या मोसमात मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली होती. त्यानंतर ऑस्ट्रेलियन संघाने इंग्लंडचा दौरा केला. जगातील सर्वात जुनी मालिका द ॲशेस १८८२ मध्ये सुरू झाली. मात्र, ऑस्ट्रेलिया-इंग्लंड १८७७ पासून कसोटी मालिका खेळत आहेत. जगातील पहिला कसोटी सामनाही या देशांमध्ये खेळला गेला. हा सामना मेलबर्नमध्ये १५ ते १९ मार्च १८७७ या कालावधीत खेळला गेला. पुढे या मालिकेचे नाव ॲशेस ठेवण्यात आले.

कांगारूंनी ३४, इंग्लंडने ३२ मालिका जिंकल्या. ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील ॲशेसमध्ये ऑस्ट्रेलियाचा वरचष्मा आहे. दोन्ही देशांमध्ये आतापर्यंत ७३ मालिका खेळल्या गेल्या आहेत. यापैकी ऑस्ट्रेलियाने ३४ मालिका जिंकल्या.

त्याचबरोबर इंग्लंडने ३२ मालिका जिंकल्या आहेत. उर्वरित ७ मालिका अनिर्णित राहिल्या. ॲशेस मालिकेतील टॉप ५ फलंदाजांपैकी ३ ऑस्ट्रेलियाचे आहेत. या फलंदाजांमध्ये पहिले नाव डॉन ब्रॅडमनचे आहे.

# पारस म्हांब्रे मुंबई इंडियन्सचा प्रशिक्षक

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

माजी भारतीय गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हांब्रे इंडियन प्रीमियर लीग च्या पुढील हंगामासाठी मुंबई इंडियन्स मध्ये सामील झाले आहेत. २००८ मध्ये ते कोचिंग स्टाफचा भाग होते. सध्याचे गोलंदाजी प्रशिक्षक लसिथ मलिंगा यांच्यासोबत मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने यांच्या नेतृत्वाखाली ते काम करतील. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या मेगा लिलावातही ते उपस्थित राहणार आहेत. फ्रेंचायझीने बुधवारी ही घोषणा केली.

पारस या वर्षी २९ जून रोजी टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक होते. राहुल द्रविड आणि विक्रम राठोड हे राजस्थानचे प्रशिक्षक आहेत. गेल्या महिन्यात राहुल द्रविड आणि विक्रम राठोड राजस्थान रॉयल्समध्ये दाखल झाले. फ्रँचायझीने २० सप्टेंबर रोजी दोन्ही भारतीय प्रशिक्षकांच्या समावेशाची घोषणा केली होती. द्रविड आणि राठोड यांच्या प्रशिक्षणात भारतीय संघाने टी-२० विश्वचषक जिंकला. पारस खेळाडूपेक्षा प्रशिक्षक म्हणून अधिक यशस्वी झाले. पारस म्हांब्रे भारताकडून २ कसोटी आणि ३ एकदिवसीय सामने खेळले आहेत. त्यांची प्रथम श्रेणीतील कारकीर्द उत्कृष्ट होती.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांना फारसे यश संपादनकरता आलेले नाही. पारसबद्दल असे म्हटले जाते की ते खेळाडूपेक्षा प्रतिभावान आणि उत्तम प्रशिक्षक आहेत.



# हरमनप्रीत कौरचे कर्णधारपद जाणार?

## बीसीसीआयने दिले संकेत

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला क्रिकेट संघाला नवीन कर्णधाराची गरज आहे का, या प्रश्नाचा शोध आता सुरू झाला आहे. दुबईत सुरू असलेल्या महिला ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत भारतीय संघ जेतेपदाचा प्रबळ दावेदार होता. परंतु, हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या संघाला साखळी फेरीतूनच माघारी परतावे लागले. भारतीय संघाने चारपैकी २ सामने जिंकले, परंतु न्यूझीलंडने त्यांना मागे टाकून उपांत्य फेरीचे तिकिट पटकावले. या स्पर्धेत भारतीय संघाची कामगिरी अत्यंत निराशाजनक झाली आणि त्यामुळेच मोठा निर्णय घेण्याच्या तयारी सुरु आहे. मागील ८ वर्षांत भारतीय महिला संघ प्रथमच वर्ल्ड कप स्पर्धेच्या साखळी फेरीतच बाहेर पडला. त्यामुळे आता कर्णधार बदलाची वेळ आली आहे का, याचा विचार सुरू झाला आहे. लवकरच बैठक बोलावण्यात येणार असून हरमनप्रीत कौरचे कर्णधारपद जाण्याची शक्यता अधिक आहे.

बीसीसीआय, निवड समिती आणि मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांच्यात लवकरच बैठक होईल आणि त्यात हरमनप्रीतच्या नेतृत्वावर चर्चा केली जाणार आहे. भारतीय संघ आता न्यूझीलंडविरुद्ध तीन वन डे सामन्यांची मालिका खेळणार आहे. २४ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या या मालिकेसाठी संघ निवडीबाबतची बैठक होणार आहे आणि त्यातच हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाचा निर्णय घेतला जाईल. २०१६ मध्ये हरमनप्रीतने ट्वेंटी-२० संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी घेतली होती. तिच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२०च्या वर्ल्ड कपमध्ये बाद फेरीत प्रवेश केला होता. परंतु, यंदाच्या पर्वात ते साखळी फेरीत पराभूत झाले. नेतृत्व जाणार असले तरी हरमनप्रीतचे संघातील स्थान कायम राहील. हरमनप्रीत ही संघाची प्रमुख खेळाडू असेल, परंतु आता बदलाची वेळ आली आहे, असे सूत्रांनी सांगितले. पुढील वन डे वर्ल्ड कप भारतात होणार आहे आणि त्यासाठीची तयारी न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेतून सुरुवात होणार आहे.



## पॉवरलिफ्टींग स्पर्धेत जिंकले सुवर्णपदक

# पुण्यातील भावा-बहिणीचा सातासमुद्रापार डंका

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

दक्षिण आफ्रिकेतील सन सिटी येथे संपन्न झालेल्या कॉमनवेल्थ पॉवरलिफ्टींग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी हडपसरच्या कादंबरी व चिंतामणी राऊत या बहिण-भावाने सुवर्णपदक पटकावले आहे.

चिंतामणी हा विशेष मुलांच्या ९३ किलो वजन गटात तर कादंबरीने मुलीच्या सब ज्युनिअर ६९ किलो वजनी गटात देशाचे प्रतिनिधित्व केले. दक्षिण आफ्रिकेतील सन सिटी येथे कॉमनवेल्थ पॉवरलिफ्टींग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी एकूण ९७ देश सहभागी झाले होते. भारतातून ६५ खेळाडू सहभागी होते. चिंतामणीने पॉवरलिफ्टींग स्कॉट या प्रकारात १५० किलो आणि बेंच या प्रकारात ७० किलो तर पॉवरलिफ्टींग डेड या प्रकारात १८० किलो वजन उचलून गोल्ड मेडल जिंकले. कादंबरी राऊतने पॉवरलिफ्टींग स्कॉट या प्रकारात जागतिक रेकॉर्ड केला आहे. मागच्या वेळेस साऊथ आफ्रिकच्या चेअंते मलदेर हिने १४५ किलो उचलून जागतिक रेकॉर्ड केलेला. पण यावेळी कादंबरीने १५० वजन उचलून जागतिक रेकॉर्ड केला आहे. यासोबत स्कॉट प्रकारत गोल्ड मेडल जिंकले आहे. बेंच या प्रकारात ७५ किलो वजन उचलून तिने सिल्वर पदक जिंकले, तर डेड या प्रकारात १४० किलो वजन उचलून अजून एक सिल्वर पदक मिळवले आहे. म्हणजेच कादंबरीला एक गोल्ड मेडल व दोन सिल्वर मेडल जिंकता आली आहेत. प्राचार्य संजय मोहिते, प्रशिक्षक टी. बाकी राज, महाराष्ट्रपॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय मोरे तसेच रवींद्र यादव आणि राजहंस मेहेंदळे व वडील बाळासाहेब राऊत यांचे बहिण भावांना मार्गदर्शन लाभले आहे.



# पाकिस्तान क्रिकेट संघाला ड्रेसिंग रूममध्ये भारताबद्दल बोलण्यास बंदी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

पुरुषांच्या ट्वेंटी-२० इमर्जिंग आशिया चषक स्पर्धेसाठी सर्व संघ सज्ज झाले आहेत. या स्पर्धेत भारत-पाकिस्तान यांच्यात १९ ऑक्टोबरला हायव्होल्टेज सामना होणार आहे. पण, या स्पर्धेसाठी पाकिस्तान क्रिकेट संघाने एक निर्णय घेतला आहे. पाकिस्तान क्रिकेट संघाला ड्रेसिंग रूममध्ये भारताबद्दल बोलण्यास बंदी असल्याचा खळबळजनक खुलासा पाकिस्तान अ संघाचा कर्णधार मोहम्मद हॅरिसने केला आहे.

१९ ऑक्टोबरला हा सामना होणार आहे. संयुक्त अरब अमिराती आणि ओमान हे भारत-पाकिस्तान यांच्या गटात आहेत. या स्पर्धेसाठी भारत अ संघाचे कर्णधारपद तिलक वर्माच्या खांद्यावर सोपवण्यात आले आहे. मोहम्मद हॅरिसचा एक व्हिडीओ व्हायरल झाला. त्यात तो म्हणतोय की, आपको एक बात बताता हू, पहली दफा होगा के पाकिस्तान टीम के ड्रेसिंग रूम में भारतीय टीमपर बात करने पे पाबंदी है. त्यामुळे क्रिकेट जगतामध्ये उलट-सुलट चर्चेला उधाण आले असल्याचे दिसत आहे.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)